

बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे







बेरार टाईम्स द्वारा प्रकाशित पर्यटन पुस्तिका उपलब्ध अंक व जाहिरातकरिता संपर्क स्थळ



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१० गोंदिया | अंक २६ | बुधवार,दि.०२ जून २०२१ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021


## महाज्योतीच्या बैठकीत क्रिमीलीअरची अट वगळली

**नागपूर :** ऑगस्ट २०२० मध्ये ‘महाज्योती’च्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. याच महिन्यात संचालकांची निवड झाली. दोन महिने पदभरतीत गेले. डिसेंबरला कामाला सुरुवातच केली असताना कोरोना वाढला, लॉकडाऊन लागले. त्यामुळे महाज्योतीसाठी काम करण्यास वेळ मिळाला नाही. संचालकांच्या बैठकी होऊ शकल्या नाहीत. त्यामुळे योजना राबविता आल्या नाहीत, प्रशिक्षण घेता आले नाही, परिणामी निधीही खर्च झाला नाही, अशी खंत महाज्योतीचे अध्यक्ष व मदत व पुनर्वसन आणि बहुजन विकास मंत्री विजय वडेट्टीवार यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केली.

महाज्योतीच्या संचालक मंडळाची तिसरी बैठक सोमवारी सामाजिक न्याय भवनात पार पडली. या बैठकीला वडेट्टीवार उपस्थित होते. बैठकीत प्राचार्य बबनराव तायवाडे, प्रा. दिवाकर गमे व लक्ष्मण वडले यांच्यासह व्यवस्थापकीय संचालक प्रदीप डांगे उपस्थित होते. पत्रकार परिषदेत त्यांनी महाज्योतीच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडविण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. कौशल्य विकास योजनेत ४० हजार युवकांना लाभ देण्यात येईल, असेही ते म्हणाले.



### ओबीसीच्या तीन विद्यार्थ्यांना घेतले ताब्यात

महाज्योतीच्या संचालक मंडळाची सोमवारी बैठक सामाजिक न्याय भवनात होती. महाज्योतीकडून असलेल्या अपेक्षांची पूर्ती होऊ न शकल्याने मंत्र्यांना जाब विचारण्यासाठी औरंगाबाद विद्यापीठातून नागपूरच्या सामाजिक भवनात आलेल्या विद्यार्थ्यांना बजाजनगर पोलिसांनी ताब्यात घेतले. यामध्ये विठ्ठल नागरे, अंकुश राठोड व वाकोडे नावाच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. महाज्योतीच्या संचालकांची बैठक होणार असल्यासंदर्भात विद्यार्थ्यांना माहिती मिळाल्याने राज्यातील काही विद्यापीठातून विद्यार्थी नागपुरात पोहोचले होते. या विद्यार्थ्यांचे म्हणणे होते की, महाज्योतीच्या व्यवस्थापकीय संचालक पदावर पूर्णवेळ आयएएस अधिकाऱ्याची नेमणूक करावी. प्रादेशिक कार्यालयाची स्थापना करावी. पीएच.डी.च्या जागा वाढविण्यात याव्यात. यूपीएससीच्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन द्यावे. यासंदर्भात पीयूष आकरे, कृतल आकरे, आकाश धुंदे, परेश बाविस्कर, राकेश उराडे या विद्यार्थ्यांनी महाज्योतीचे अध्यक्ष विजय वडेट्टीवार यांची भेट घेऊन निवेदन दिले.

### संचालक मंडळाच्या बैठकीत निर्णय

१) पीएच.डी.ची फेलोशिप ५०० विद्यार्थ्यांना देणार, २०१७ पासून नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांचा समावेश करणार. ५ वर्षांसाठी २१ हजार रुपये विद्यावेतन देणार.
२) एमफीलसाठी २०० विद्यार्थ्यांची निवड.
३) बँकिंग परीक्षेसाठी प्रशिक्षण.
४) भटक्या जातींच्या संशोधनासाठी दिल्लीच्या संस्थेला काम देणार.
५) युपीएससीसाठी १००० व एमपीएससीसाठी २००० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण.
६) कौशल्य विकास योजनेचा लाभ ४० हजार विद्यार्थ्यांना देणार.
७) पोलीस भरतीपूर्वी प्रशिक्षण व उच्च शिक्षणासाठी प्रवेश पूर्व परीक्षेच्या कोचिंगचे टार्गेट पूर्ण करणार.
८) शाळा, महाविद्यालयात महाज्योतीच्या योजनांचे फलक लावणार.
९) प्रत्येक जिल्ह्यात चित्ररथाच्या माध्यमातून जनजागृती करणार.
१०) शेतकऱ्यांसाठी तेल बियाण्यांचे क्लस्टर तयार करणार.



### ३५ कोटीच मिळाले महाज्योतीला

महाज्योतीला आतापर्यंत ३५ कोटी मिळाले आहेत. १५० कोटी रुपयांची तरतूद केली असून, अजूनही निधी मिळाला नाही. ३५ कोटींपैकी ३.५ कोटी रुपये खर्च झाले आहेत. मिळालेला निधी परत जाणार नाही, तो योग्यवेळी खर्च होईल, असे वडेट्टीवार म्हणाले.

### २० विद्यार्थ्यांना बनविणार वैमानिक

महाज्योतीने २० विद्यार्थ्यांना वैमानिकाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यासाठी फ्लाईंग क्लबला २.५ कोटी दिले आहेत. विभागीय आयुक्तांना त्याची जबाबदारी दिली आहे. या २० विद्यार्थ्यांमध्ये २ विद्यार्थी शहिदाच्या कुटुंबातील, २ विद्यार्थी शेतकरी आत्महत्या केलेल्या कुटुंबातील, व्हीजेएनटीच्या ४ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

### न्यायालयाने ओबीसीचे राजकीय आरक्षण नाकारले नाही

सवीच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी आरक्षणाबद्दल जो निर्णय दिला आहे, त्यात न्यायालयाने ओबीसीचे राजकीय आरक्षण नाकारले नाही, असे मत बहुजन विकास मंत्री विजय वडेट्टीवार यांनी सांगितले. ते म्हणाले की, मुख्यमंत्र्यांकडे आम्ही मागणी केली की, निवृत्त न्यायाधीशांच्या नेतृत्वात आयोग नेमण्यात यावा. जातीनिहाय जनगनणा व्हावी. स्थानिक स्वराज्य संस्थेतील आरक्षण ५० टक्क्यावर जाऊ नये म्हणून आयोगाच्या शिफारशी व जनगणनेच्या अहवालानुसार न्यायालयात बाजू मांडण्यात यावी. ओबीसीच्या राजकीय आरक्षणाचा तिढा सोडविण्यासाठी केंद्र सरकारनेही आयोग नेमून ओबीसीचे आरक्षण २७ टक्के निश्चित करावे.




निवृत्त न्यायाधीश मार्फत आयोग नेमुन ओबीसीची जनगणना करून लोकसंख्येचे प्रमाण सुप्रीम कोर्टात सादर करून राजकिय ओबीसी आरक्षणाचा प्रश्न निकाली काढून न्याय मिळवून देण्यात यावे अशी मागणी राष्ट्रीय ओबीसी महासंघाने विजय वड्डेटीवार यांच्याकडे निवेदनातून केली आहे.यावेळी महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## कोर्टाच्या माध्यमातून तोडगा काढावा-छगन भुजबळ

**नाशिक:** आपण लोकांना सांगायचे गर्दी करू नका आणि आपणच आंदोलने करत नियम तोडणे योग्य नाही, आम्ही सरकारमध्ये आहोत, ओबीसींचे आरक्षण जपण्यासाठी आम्ही महाविकास आघाडी सरकार म्हणून सनदशीर मार्गाने, न्यायालयाच्या माध्यमातूनच तोडगा काढू, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री आणि ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी व्यक्त केली. ओबीसींच्या जनगणनेच्या न्यायालयाच्या आदेशाचे त्यांनी स्वागत केले. ओबीसींच्या लोकसंख्येच्या मुद्द्यावर राज्यातील काही स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसींचे राजकीय आरक्षण सवीच्च न्यायालयाने रद्द केले आहे.



महाविकास आघाडी सरकारच्या नाकर्तेपणामुळे ओबीसींचे आरक्षण रद्द झाल्याचा ठपका माजी मुख्यमंत्री आणि भाजपचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी ठेवला आहे. आघाडीतील मंत्री आणि ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी मात्र याबाबत केंद्रातील भाजप सरकारलाच जबाबदार धरले आहे. २०११ च्या जनगणनेची आकडेवारी केंद्र सरकारकडे आहे, त्यांनी ती आकडेवारी न्यायालयाला न दिल्याने ही वेळ आल्याचे भुजबळ म्हणाले. “आम्ही तर ओबीसींच्या स्वतंत्र जनगणनेची मागणी केव्हापासून करत आहोत, आता न्यायालयाच्या आदेशानुसार तरी ही मोजणी करा. ओबीसींच्या ३५० जाती आहेत आणि लोकसंख्येतील प्रमाण ५४% आहे, ते नेमके सिद्ध होईल आणि ज्यांच्या मनात शंका आहेत त्यांचे निरसन होईल’, असे ते म्हणाले.

आता रद्द झालेल्या आरक्षणाबाबत कोविडच्या साथीत आपण रस्त्यावर उतरून आंदोलन करणे योग्य होणार नसल्याचे सांगून न्यायालयाच्या माध्यमातूनच यावर तोडगा काढणार आहोत. एवढे शेतकरी रस्त्यावर उतरून आंदोलन करीत आहेत, त्यांच्यातील कित्येकांचे बळी गेले, तरी सरकारला जाग येत नसल्याचा दाखला त्यांनी यासंदर्भात बोलताना दिला.

या खटल्यात सरकारची बाजू मांडणाऱ्या महाधिवक्त्यांसह सर्व ओबीसी मंत्री व नेत्यांची मुख्यमंत्र्यांसोबत या आठवड्यात बैठक होणार असल्याचे ते म्हणाले. या बैठकीत सर्व कायदेशीर बाबींची पडताळणी करून रद्द झालेल्या ओबीसींच्या राजकीय आरक्षणाबाबतची पुढील दिशा ठरवण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

### केंद्रामुळे ओबीसींचे आरक्षण रद्द-नाना पटोले

**भंडारा:** सवीच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थेतील अतिरिक्त ओबीसी आरक्षण रद्द ठरवण्याचा निर्णय सुनावला आहे. मुळात ओबीसींची आकडेवारी किती, याची माहिती केंद्र सरकारने न दिल्याने सवीच्च न्यायालयाने हा निकाल दिला आहे. त्यामुळे केंद्र सरकारमुळेच ओबीसींचे आरक्षण रद्द झाल्याची टिका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भंडारा येथे केली.



स्थानिक स्वराज्य संस्थेमधील ओबीसींचे आरक्षण सवीच्च न्यायालयाने रद्द केल्यामुळे ग्रामपंचायत, जिल्हापरिषद आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसींना मिळणारे अतिरिक्त राजकीय आरक्षण संपुष्टात आले आहे. यावर बोलताना नाना पटोले म्हणाले, ओबीसींची आकडेवारी किती, याबाबत माहिती देण्यास केंद्र सरकारने नकार दिला आहे. देशाचे गृहमंत्री अमित शहा हे ओबीसींची जनगणना करणार नाही, अशी भूमिका घेतात. त्यामुळे १९३१ च्या ओबीसींच्या जनगणनेनुसार सवीच्च न्यायालयाने आरक्षण रद्द केले. असे असताना राज्य सरकारच्या नाकर्तेपणामुळेच ओबीसींचे आरक्षण संपुष्टात आल्याची प्रतिक्रीया भाजपकडून दिली जात आहे. परंतु, भाजपची ओबीसीविरोधी भूमिका जनतेच्या लक्षात आली आहे. ओबीसींच्या राजकीय, शैक्षणिक, व सामाजिक आरक्षण अबाधित ठेवण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याचेही नाना पटोले म्हणाले.

यावेळी काँग्रेस प्रवक्ता अतूल लोंढे, जिल्हाध्यक्ष मोहन पंचभाई, महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री बोरकर, प्रेमसागर गणवीर उपस्थित होते.

## तीन महिन्यांत जनगणना न केल्यास आंदोलन:भाजप

**नागपूर :** छगन भुजबळ, विजय वडेट्टीवार हे ओबीसी मंत्री असताना आणि नाना पटोले हे ओबीसी नेतृत्व असतानाही महाराष्ट्रातील आघाडी सरकारने ओबीसींच्या जनगणनेकडे दुर्लक्ष केल्यामुळेच सवीच्च न्यायालयाचा निकाल आला. या सरकारने येत्या तीन महिन्यांत ओबीसी जनगणना न केल्यास गावागावात आंदोलन करण्यात येईल, असा इशारा भाजपचे प्रदेश महामंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला. स्थानिक संविधान चौकात भाजप ओबीसी नेत्यांनी सरकारविरोधात आंदोलन करत निषेध केला.

राज्यातील भारतीय जनता पक्षाचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने ओबीसी समाजाचे राजकीय आरक्षण कायम ठेवण्यासाठी ३१ जुलै २०१९ रोजी अध्यादेश काढला होता. परंतु राज्यातील विद्यमान महाविकास आघाडी सरकारने याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने सवीच्च न्यायालयाने ओबीसींचे राजकीय आरक्षण रद्द केले. त्यामुळे यापुढे कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेत ओबीसींना आरक्षण राहणार नाही. महाराष्ट्राचे ठाकरे सरकार यासाठी जबाबदार असल्याचा आरोप बावनकुळे यांनी केला.




१४ महिन्यांत सरकारने ना वकील लावला ना आयोग नेमला. आयोग नेमण्याच्या फाइलवर सही करायला मुख्यमंत्र्यांना वेळ नाही, अशी टीका बावनकुळे यांनी केली.

## राज्यात खासगी रुग्णालयांना कोविड उपचारासाठी दर शहरांच्या वर्गीकरणानुसार

**मुंबई : –** कोरोना संसर्गाच्या दुसऱ्या लाटेचा तडाखा ग्रामीण भागाला बसला आहे. कोविड उपचारांसाठी खासगी रुग्णालयांमध्ये येणारा अवाच्या सव्वा खर्च थांबविण्यासाठी आणि सर्वसामान्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीकोनातून खासगी रुग्णालयांच्या उपचाराचे दर निश्चित करण्यात आले आले असून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी त्याबाबतच्या अधिसूचनेला मंजूरी दिली आहे. यानुसार आता शहरांचे वर्गीकरण करून दर निश्चित केले आहेत, यात निश्चित दरांशिवाय अधिक दर आकारता येणार नाहीत.

या अधिसूचनेची काटेकोर आणि परिणामकारक अंमलबजावणी व्हावी याबाबत सर्व संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांना निर्देश दिले आहेत.

खाजगी रुग्णालयात कोवीड बाधित रुग्णांवर उपचारासाठी ८० टक्के खाटांसाठी शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार व उर्वरित २० टक्के खाटांसाठी खाजगी रुग्णालयांनी निश्चित केलेल्या दरानुसार दर आकारणी करण्याबाबतची अधिसूचना संपली.त्यास मुदतवाढ देताना त्यात शहरांच्या वर्गीकरणानुसार सुधारणा करण्यात आली आहे.

यासंदर्भात सार्वजनिक आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी दिलेल्या प्रस्तावात म्हटले आहे की, दर कमी करण्याबाबत अनेक निवेदने त्यांच्याकडे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे प्राप्त झाली होती. उपमुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत राज्य आरोग्य हमी सोसायटी यांचेशी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने या दरांमध्ये गाव, शहरांचे वर्गी रण करून बदल करण्याबाबत ठरले व तसा प्रस्ताव मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आले होते.

यापुर्वीच्या अधिसुचनेत उपचारांचे दर हे मोठ्या शहरातील रुग्णालये व अति दुर्गम भागातील रुग्णालये यासाठी एकच होते. शहरांच्या वर्गीकरणामुळे आता उपचारांच्या खर्चात मोठा दिलासा मिळणार आहे. विमा कंपन्या आणि विविध प्रकारच्या भत्ते देताना ज्याप्रमाणे शहरांचे वर्गीकरण केले जाते. त्याच निकषावर वर्गीकरण आणि संबंधित उपचारांचे दर निश्चित केल्याने, विशेषतः ग्रामीण भागातील रुग्णांवरील उपचारांचा खर्च तुलनेने कमी होणार आहे.

दरांसाठी शहरांच्या दर्जानुसार वर्गीकरण करण्यात आले आहे. अ, ब, क अशा गटात शहरे व भागांची विभागणी केली आहे त्यामुळे आता शहरी व ग्रामीण भाग यामध्ये उपचारांचा दर वेगवेगळा असेल व पर्यायाने ग्रामीण भागात तुलनेने कमी खर्चात उपचार शक्य होतील.

रुग्णाला संबंधित रुग्णालयाने पुर्वलेखापरिक्षीत देयक देणे बंधनकारक करण्यात आले आहे. याशिवाय जास्त दर आकारणाऱ्या रुग्णालयांवर भरारी पथकांमार्फत पुन्हा तपासणी करण्याची आणि त्यावर कारवाई करण्याची तरतूदही या अधिसूचनेत कायम ठेवण्यात आली आहे.क वर्ग शहरांसाठी ५४०० रुपये व ४५०० रुपये दर निश्चित केले आहे.

### भंडारा-गोंदिया जिल्ह्यात रुग्ण संख्येत घट

**गोंदिया:** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोंदिया येथील विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेतून ०१ जून रोजी प्राप्त अहवालात जिल्ह्यात नवे २३ कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आले.५० कोरोना पॉझिटिव्ह रुग्णांनी औषधोपचारातून कोरोनावर मात केल्याने त्यांना आज सुट्टी देण्यात आली. जिल्ह्यातील कोरोना बाधित १ रुग्णाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.आजपर्यंत ४०,७४० रुग्ण कोरोना पॉझिटिव्ह आढळले आहे. ३९,७४० रुग्णांनी आतापर्यत कोरोनावर मात केली आहे. क्रियाशील असलेल्या जिल्ह्यातील बाधित रुग्णांची संख्या ३१० आहे.१७६ क्रियाशील असलेले बाधित रुग्ण घरीच अलगीकरणात आहे. आतापर्यत जिल्ह्यातील ६९० रुग्णांचा मृत्यू झाला. जिल्ह्यातील कोरोना बाधित रुग्ण आजारातून बरे होण्याचे प्रमाण ९७.५५टक्के आहे. बाधित रुग्णांचा मृत्यू दर १.६१ टक्के आहे

**भंडारा,–** जिल्ह्यात मंगळवारला ६० रुग्ण बरे होऊन घरी गेले असून बरे झालेल्या रुग्णांची संख्या ५६८१५ झाली असून आज ९० नवे कोरोना बाधित रुग्ण आढळून आले आहेत. पॉझिटिव्ह रुग्णांची संख्या ५८८५५ झाली आहे. रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९६.५३ टक्के आहे.आज १५८५ व्यक्तींच्या घशातील स्त्रावाचे नमुने तपासण्यात आले असून त्यापैकी ९० व्यक्ती कोरोना पॉझिटिव्ह आढळून आल्या आहेत. आतापर्यंत ०३ लाख ८७ हजार ९३८ व्यकींच्या घशातील स्त्रावाची तपासणी करण्यात आली. त्यात ५८८५५ व्यक्ती कोरोना पॉझिटिव्ह आढळून आल्या.जिल्ह्यात आज कोरोना पॉझिटिव्ह आलेल्या मध्ये भंडारा तालुक्यातील ०२, मोहाडी ११, तुमसर ०२, पवनी ०१, लाखनी ०९, साकोली ६४ व लाखांदुर तालुक्यातील ०१ व्यक्तीचा समावेश आहे. आतापर्यत ५६८१५ रुग्णांनी कोरोनावर यशस्वीपणे मात केली आहे. जिल्ह्यात आता कोरोना बाधितांची संख्या ५८८५५ झाली असून ९८६ क्रियाशील रुग्ण आहेत. आज कोरोनाच्या ०० रुग्णांचा मृत्यू झाला असून जिल्ह्यात कोरोना पॉझिटिव्ह मृतांची संख्या एकूण १०५४ झाली आहे. रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९६.५३ टक्के आहे. तर जिल्ह्याचा मृत्युदर ०१.७९ टक्के एवढा आहे.


## ग्रामपंचायत,पं.स.व जिल्हा परिषदांमध्ये ६ जून रोजी “शिवस्वराज्य दिन”

**मुंबई, – :** छत्रपती शिवाजी महाराजांचा ६ जून १६७४ या दिवशी रायगडावर राज्याभिषेक झाला होता. या महापुरुषाच्या लोककल्याणकारी स्वराज्यातील महत्त्वाचा दिवस म्हणजेच शिवस्वराज्यभिषेक दिन होय. हा दिवस स्वराज्याची, सार्वभौमत्वाची, स्वातंर्त्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. अशा या भूमिपुत्राच्या स्वातंत्र्य दिनाचे महत्व आणखी दृढ होण्यासाठी ६ जून हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रातील ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषद कार्यालयांमध्ये “शिवस्वराज्य दिन” म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

यंदा कोरोना प्रतिबंधविषयक नियमांचे पालन करुन राज्यातील सर्व जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींमध्ये हा दिन साजरा करण्यात येणार आहे, अशी माहिती ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली.

यासंदर्भातील निदेश ग्राम विकास विभागाने ०१ जानेवारी २०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिले आहेत. यानुसार शिवस्वराज्य दिन साजरा करण्यात येईल, असे मंत्री श्री. मुश्रीफ यांनी सांगितले.

जिल्हा मुख्यालय येथे पालकमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि जिल्हा परिषद पदाधिकारी, अधिकारी यांच्या उपस्थितीत शिवस्वराज्य दिन साजरा करण्यात येईल. पंचायत समित्या, ग्रामपंचायतींमध्ये पदाधिकारी, अधिकारी/कर्मचारी यांच्या उपस्थितीत शिवस्वराज्य दिन साजरा करण्यात येईल. कोरोना प्रतिबंधाबाबत शासनाने जारी केलेल्या सर्व नियमांचे पालन करुन हा दिन साजरा करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या दिवशी राज्यातील सर्व ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषद कार्यालयांमध्ये सकाळी सर्व पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी यांनी भगव्या स्वराज्यध्वजासह



शिवशक राजदंड स्वराज्यगुढी उभारुन त्यास अभिवादन करावे व राष्ट्रगीत व महाराष्ट्र गीताचे गायन करुन कार्यक्रम संपन्न करण्यात यावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. यापुढे दरवर्षी ६ जून रोजी हा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे.

मंत्री श्री. मुश्रीफ म्हणाले की, रयतेच्या हिताचा कारभार कसा असावा याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेला राज्यकारभार! शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठासही मन न दाखवने, अशी आज्ञा देणारा इतिहासातील पहिला राजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. सतराव्या शतकात या महाराष्ट्रात भूमिपुत्रांचे हिंदवी स्वराज्य शिवाजी महाराजांनी स्थापन केले. परकीय आणि स्वकीय अशा जुलमी सत्ताधिशांशी, वतनदारांशी अनेक लढाया, युध्दे लढून या महाराष्ट्र भूमीत स्वराज्याची निर्मिती केली. जुलमी राजवटी संपुष्टात आणण्यासाठी सर्व जातीधर्माच्या अठरापगड बारा बलुतेदार, जिवाभावाचे मावळे एकत्र करुन हा लढा दिला. अनेक किल्ले सर केले. जनतेसाठी कसे राज्य करावे याचा आदर्श निर्माण केला. आपल्या राज्यातील जनतेसाठी, शेतकऱ्यांसाठी अनेक वटहुकुम काढले. या महाराष्ट्रातील तमाम जातीधर्माचे लोक या स्वराज्याच्या कार्यात सामील झाले.

छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचेच नव्हे तर अखील भारत वर्षाचे प्रेरणास्थान आहेत. राष्ट्रनिर्माता असलेल्या या महापुरुषाच्या लोककल्याणकारी स्वराज्यातील महत्त्वाचा दिवस म्हणजे ६ जून १६७४ म्हणजेच शिवराज्यभिषेक दिन होय.

या दिवशी रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला होता व शिवाजी महाराज छत्रपती झाले होते. याच दिवशी स्वराज्याचे सार्वभौमत्व दुर्ग रायगडाच्या राजसदरेवरून घोषित झाले. याच दिवशी श्री शिवराज्याभिषेक शकाची निर्मिती करून महाराज शक कर्ते ही झाले. तो हा शुभदिन होय.

महाराजांनी तत्कालीन प्रस्थापित सत्तांना पालथे करून स्वतःच्या सार्वभौम स्वराजाचा पवित्र मंगलकलश जनतेला अर्पण करुन रयतेची झोळी सुखसमृध्दीने भरली होती आणि याच पवित्र दिवशी शिवकालगणनेला प्रारंभ झाला होता. तो दिवस आता दरवर्षी शिवस्वराज्य दिन म्हणून साजरा करण्यात येणार आहे, असे मंत्री श्री. मुश्रीफ यांनी सांगितले.

## गोंदियाचे नितीन बोरकर उच्च न्यायालयाचे बनले न्यायमुर्ती

**गोंदिया:** मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायमुर्ती अविनाश घरोटे, न्या. अनिल किलोर, न्या. वीरेंद्रसिंग बिष्ट, न्या. मुकुलिका जवळकर व न्या. नितीन बोरकर यांच्यामुळे नागपूर व गोंदिया जिल्ह्यांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. नागपुरात जडणघडण झालेल्या या पाचही अतिरिक्त न्यायमुर्तींना त्यांच्या उत्कृष्ट कार्यामुळे सेवेत कायम करण्यात आले आहे. त्यांचा शपथविधी हा १ जून रोजी मुंबई येथे पार पडला.

न्या. नितीन बोरकर हे मुळचे गोंदिया सिव्हील लाईन माता मंदिर वॉर्ड येथील रहिवासी आहेत. त्यांचे शिक्षण नागपूर येथून पूर्ण झाले. त्यांचे वडील रूद्रसेन बोरकर हे सुद्धा प्रसिद्ध वकील आहेत. त्यामुळे न्याय व्यवस्थेचे धडे त्यांना घरातूनच मिळाले. न्या.



बोरकर यांनी आधी वडील रूद्रसेन बोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली वकिली केली. न्यायीक अधिकारी झाल्यानंतर त्यांनी विविध जिल्हा व सत्र न्यायालयांमध्ये कार्य केले. उच्च न्यायलयाच्या न्यायमुर्ती पदी नियुक्ती होण्यापुर्वी ते चंद्रपूरमध्ये प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश होते. त्यांच्या उत्कृष्ट कार्यामुळे त्यांना सेवेत कायम करण्यात आले आहे. ही निश्चितच जिल्हावासीयांसाठी गौरवाची बाब आहे.

विशेष म्हणजे न्या. बोरकर यांचे दोन भाऊसुद्धा वकील आहेत. सचिन बोरकर हे गोंदिया जिल्हा सत्र न्यायालयात वकील आहेत. तर विवेक बोरकर हे मुंबई उच्च न्यायलयाच्या नागपूर खंडपीठात वकील आहेत. एक भाऊ शैलेश बोरकर हा इंजिनिअर आहे. तर बहीण मीना बोरकर मेश्राम ही डॉक्टर आहे. न्यायमुर्ती नितीन बोरकर हे सुरुवातीपासूनच शिक्षणात हुशार होते. त्यांनी सुरुवातीपासूनच न्यायमुर्ती होण्याचे ध्येय बाळगत त्या दृष्टीने परिश्रम घेत शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर विविध ठिकाणी त्यांनी न्यायिक कार्य केले. त्यांच्या उत्कृष्ट कार्यामुळेच त्यांना सेवेत कायम करण्यात आले आहे. ही समस्य जिल्हावासीयांसाठी निश्चितच अभिमानाची बाब आहे.

## संपादकीय

### ओबीसींच्या ५२% आरक्षणाचं आणि ओबीसींच्या जनगणनेचं, प्रामाणिकपणे समर्थन कोण करतंय?

फक्त ओबीसीं शिवाय थेट या ५२% आरक्षणाचं समर्थन कोणीही केलेलं नाहीत! हे ओबीसीही पुर्णाशानी आरक्षणाचे समर्थक नाहीत! ....चुपके चुपके लाभाथी व्हायचं, पण संघर्ष – आंदोलन करायचा नाही! ... तिकडे ब्राम्हणांचीही गुलामी करायची! ...तिथं ब्राम्हणांनी टाकलेला तुकडाही चघळत राहायचा! आणि भेटलं, तर इकडंही सवलत घ्यायची! ...ओबीसी हा एवढा खुदगर्ज समाज आहे! .....

ओबीसींना त्यांच्या लोकसंख्येप्रणाने आरक्षण मिळू नये, म्हणून हे इंदिरा सहानी खटल्यात पन्नास टक्केचं बँन लावणारे कोण होते?....२००२ पासून महाराष्ट्र राज्याच्या विविध मागास जिल्ह्यात ओबीसी सत्तावीस टक्क्यांसाठी पण मोहताज आहे! ....ते मिळावं म्हणून कोण कोणं ओबींसींचं समर्थन केलं? ....ब्राम्हण – बनियांचच काय घेऊन बसलात? ....ओबीसींना काही मिळूच नये, ही तर त्यांची स्टँटेजीच आहे! .... पण समतेच तत्व ऊगाळणारे तरी, या लूटींवर पाणी सोडायला तैयार आहेत काय? ....महाराष्ट्रातल्या सात जिल्ह्यात ओबीसींच्या २७% मधलं कापून आदिवासींना दिलंय! ....आणि आपण ओबीसींच्या लोकसंख्येप्रमाणे ५२% आरक्षणाचं बोलताय!....तरीही ओबीसी चुप!...तोंड दाबून बुक्क्यांचा मार खातोय आम्ही!....

मराठ्यांनी बावन मोर्चे काढले, तेंव्हाही काही ओबीसीं, त्यांना समर्थन देण्यासाठी त्यांच्या मोर्च्यात जात होते! ...आपलीच धूत नाही, नी चालले बैताळ–बेलने!.... इंद्रा साहानी खटल्यात हे पन्नास टक्केचा कोलदांडा घालून ओबीसींच्याच हक्काचं दिल्या जात नाही आहेत, हे तेंव्हा कोण्या मोर्चेकरी मराठा नेत्यांना, त्यांनी विचारलेलं असेल काय? त्या नेत्यांना ते समजलेलं तरी असेल काय? ....हे पन्नास टक्केचं बँन हटलं नाही, तर आमचं मराठ्यांचही आरक्षण, मग हा फसणवीस कोण्या भोकातून देणार होता?...हा साधा प्रश्न त्या मराठा नेत्रुत्वाला कां पडला नाही? ...

एकूण हा वितंडवाद वाढवत वाढवत न्यायचा, नी भक्कन आरक्षणच खतम करुन टाकण्याच्या या दिर्घ ब्राम्हणी खेळीचा हा भाग वाटतो! ....

आता म्हणे पुन्हा स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसींचं राजकीय आरक्षण संपविलंय! ....

ह्या केसचं टायमींग बघा! ...आणि हेही मराठा आरक्षणांसारखी त्या फसणविसाच्याच काळातली केस आहे! ....बरोबर महाविकास आघाडीला जमलं नाही रे, ...हे सांगायला पेरुन ठेवलेली केस!...

आता या मुद्द्यांवर राजकारण बरोबर तापविता येतं! ते तसं तापवित आहेतच! ...तर मग हे आरक्षण देण्यामागचा त्यांचा हेतू खरा होता काय? ....

तात्पर्य, कोणीच कोणासाठी पायघड्या अंथरुन बसलेलं नाहीय! ....सर्वांनांच दुसऱ्याचं आरक्षण खटकतंय! ...मात्र आपलं बरोबर वाटतेय!...

ती स्थानिक स्वराज्य संस्थातील राजकीय आरक्षणाची मागणी कोणी केलेली होती? ...दलित – आदिवासींना तर ते मिळतच होतं! ओबीसींनाही देऊन टाकलं, तर त्यांचीही मतं मिळत राहतील, आणि राजकीरणात चमचे पैदाईश वाढविता येईल, हा द्रुष्टीकोन!....

मग राजकीय आरक्षणच द्यायचच होतं, तर दलित – आदिवासीं सारखं ओबीसींनाही विधानसभा नी लोकसभेलाही द्यायचं होतं!...

तसं पाह्यलं, तर त्या स्थानिक स्वराज्य संस्था – ग्रामपंचायत, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा या ग्रामिण तबक्याचं प्रतिनिधीत्व करणाऱ्या संस्था! तिथंला ग्रामिण भागातला रहिवासी कोण? ..बहूसंख्य ओबीसींच! त्याला आता शंभर टक्के जागांवर ऊभं राहता येतं! पुर्वी खेळ्या करुन वार्ड रिजर्व करायचे खेळ आता चालणार नाहीत! ...फायदाच की?....

राहिला शहरी भाग! नगरपालिका, महानगर पालिका, तिथं काही अंशी फरक पडू शकतो! ....पण या संस्थांकडे आता कोणते असे मोठे अधिकार सरकारनी शिल्लक ठेवलेले आहेत? ...साऱ्या आर्थिक नाड्या आवळलेल्या आहेत! ..राजकीय पार्ट्यांचे दलाल – ठेकेदार तैयार करणाऱ्या या स्थानिक स्वराज्य संस्थांऐवजी आम्हा ओबीसींला नोकऱ्यातील आणि शिक्षणांतील संपुर्ण ५२% आरक्षण लागू करा! तर काहीतरी तुम्ही आम्हाला दिलं, असं म्हणता येईल!....ते आमच्या कामाचं आहे! ....त्यासाठी जनगणना करा ना! ....कोण किती टक्के हे तर माहिती करा! मराठ्यांनी आरक्षणांसाठी मोर्चे काढण्या अगोदर, जनगणनेची ओबीसींची मागणी लावून धरली असती, तर मी खात्रीनं सांगतो, त्यांच्या SEBC आरक्षणांसाठी सुध्दा ते फायद्याचे राहिले असते!

**शाम झाडे! ब्रम्हपुरी.**

# ओबीसी व विजाभजच्या राजकीय आरक्षणावर कुऱ्हाड– प्रा.हरी नरके

प्रश्न १– ओबीसींना हे आरक्षण कुणी व कधी दिले होते ? हे आरक्षण फकत ओबीसींना होते काय ?

उत्तर– मंडल आयोग शिफारस व घटना दुरुस्ती ७३ व ७४ ची अंमलबजावणी करून १९९४ साली ओबीसी चळवळीच्या मागणीवरून महाराष्ट्रात हे आरक्षण श्री शरद पवार यांनी दिले होते. हे २७ टक्के आरक्षण राज्यातील सर्व भटके विमुक्त,अ,ब,क,ड व विशेष मागास प्रवर्ग आणि ओबीसी यांना एकत्रित मिळून होते. शिक्षण आणि शासकीय नोकऱ्या यांत भटके विमुक्त, अ,ब,क,ड यांना ११ टक्के, विमाप्र यांना २ टक्के व ओबीसी यांना १९ टक्के असे स्वतंत्र आरक्षण असले तरी राजकीय आरक्षण मात्र या तिघांनाही एकत्रित असे दिलेले आहे. हे राजकीय आरक्षण ३२ टक्के नसून २७ टक्केच आहे. त्यामुळे निवडणुकीत विजाभज, विमाप्र व ओबीसी यांना एकाच मतदारसंघातून निवडणूक लढवावी लागते. त्यांना वेगळे वेगळे आरक्षण मिळत नाही. या आरक्षणावर तीन महिन्यांपुर्वी ४ मार्च २०२१ रोजी कुऱ्हाड बसली असली तरी तमाम लाभार्थी व समाज, जाती, वर्ग सारेच गप्प आहेत. गाढ झोपेत आहेत बिचारे ! डोक्यावरचे छप्पर गेले तरी निद्रेत असलेले हे सगळे समाज राजकीयदृष्ट्या किती मागासलेले आहेत ते दिसतेच आहे.

प्रश्न २– हे आरक्षण कुठे कुठे होते व आहे ?

उ– राज्यातील सुमारे ३६ हजार ग्रामपंयती, ३५० पंचायत समित्या, नगर परिषदा, नगर पालिका, २४ जिल्हा परिषदा व २७ महानगर पालिका यात हे आरक्षण होते.

प्रश्न ३– आजवर याचा लाभ किती ओबीसींना झाला ?

उ– सुमारे ५ लाख ओबीसी स्त्रीपुरुषांना व हजारो घुसखोरांना जितीची खोटी सर्टीफ़िकेट्स घेतलेल्यांना याचा लाभ झाला आहे.

प्रश्न ४– हे आरक्षण कमी का झाले ? तसेच ते किती कमी झाले ?

उ– विकास किसन गवळी यांनी सर्वोच्च न्यायालयात जाऊन या आरक्षणाला आव्हान दिले. ते सुप्रिम कोर्टाने मान्य केले आणि ह्या आरक्षणाची छाटणी केल्याने आता निम्म्यापेक्षा जास्त जागा गेल्या आहेत. उरलेल्यासुद्धा यापुढे भलतेच लोक पळवतील आणि तमाम भटके विमुक्त,अ,ब,क,ड व विशेष मागास प्रवर्ग आणि ओबीसी यांच्या हातात धत्तुरा राहणार आहे !

प्रश्न ५– गेले तर गेले, काय फरक पडतो ? या आरक्षणाची मुळात गरजच काय ?

उ– मुळात देशाला स्वातंत्र्य मिळून ७४ वर्षे झाली तरी देशाच्या राजसत्तेत तमाम भटके विमुक्त अ,ब,क,ड व विशेष मागास प्रवर्ग आणि ओबीसी यांना २–४ टक्केसुद्धा प्रतिनिधित्व मिळालेले नाही. आपला भारतीय समाज जातीपातींनी बनलेला आहे. आपली सामाजिक जाणीव ही मूलतः जातजाणीव आहे. त्यामुळे जो तो समाज स्वतःपुरते बघतो. ज्यांच्या हाती राजसत्ता त्यांच्या हाती देशाच्या तिजोरीच्या चाव्या ! त्यामुळे त्यांचाच विकास ! रोजगार, आरोग्य, शिक्षण आणि प्रशासन यांत तेच ! माध्यमांतही तेच ! परिणामी जे राजसत्तेत गैरहजर आहेत त्यांचा आवाज उमटतच नाही. इंग्रजी राजवट आपण का घालवली ? तर ती परकी होती. गोरे गेले पण आले ते काळे कोण होते ? कोण आहेत ? गोरे जाऊन मूठभर त्र्यवर्णिक सत्तेत आले. आरक्षणामुळे थोडी जागृती अनुसुचित जाती, जमातींची झाली. पण त्यांनाही त्यांचा हक्काचा वाटा मिळालेला नाहीच. मंडल आयोगामुळे व ७३व्या – ७४ व्या घटना दुरुस्तीमुळे भटके विमुक्त अ,ब,क,ड व विशेष मागास प्रवर्ग आणि ओबीसी यांना आत्ता कुठे मिळू लागले नाही तोच ते काढूनही घेतले गेले. पण ना कुणाला खंत ना खेद, ना सोयरसुतक !

या आरक्षणाचा फायदा असा झाला होता की तमाम भटके विमुक्त अ,ब,क,ड व विशेष मागास प्रवर्ग आणि ओबीसी यांचे राजकीय प्रशिक्षण होऊ लागले होते. राजसत्ता काय असते ते यांना कळू लागले होते. त्यांच्या राजकीय महत्वाकांक्षा जाग्या होऊ लागल्या. ते चक्क विधानसभा व लोकसभेला उमेदवारी तिकीटं मागू लागले. त्यामुळे मालक लोकांची राजसत्तेवरची व गावगाड्यावरची पकड ढिली होऊ लागली.

अनु.जाती– जमाती,अल्पसंख्याक व हे भटके विमुक्त अ, ब, क, ड व विशेष मागास प्रवर्ग आणि ओबीसी हे सगळे घटक मिळून पंचायत राज्यात राजकारणाची नवी समीकरणं तयार होऊ लागली. हे काळ्या इंग्रजांना कसे खपावे ?

हे आरक्षण गेल्याने यापुढे विजाभज, विमाप्र, ओबीसी यांचे राजकीय प्रशिक्षण, जागृती आणि प्रतिनिधित्व जाणार ! पुन्हा एकदा सगळी राजसत्ता मालक लोकांच्या हातात एकवटणार ! अनु.जाती, जमातीही पुन्हा मागे फेकल्या जाणार ! थोडक्यात या घटकांचा राजकीय अंत होणार !

प्रश्न ६ – याचिकाकर्ते स्वतः ओबीसी असताना त्यांनी असा पायावर दगड का पाडून घेतला असेल बरे ?

उ– लहान मुलांनासुद्धा आपला स्वार्थ, फायदा कळतो. पण मानसिक गुलाम असलेल्या ओबीसींना त्यांच्या स्वतःच्या हाताने मालक लोक घर जाळायला लावतात आणि हे दीडशहाणे अविचार करून बसतात. जे आत्मनाशाला, आत्महत्त्येला उत्सुक असतात त्यांना त्यांचे मालक ऑपरेट करीत असतात. ओबीसी हा स्वतःच्या धडावर परक्याचे डोके आणि तेही मेंदूविहीन वागवत असतात, असा आजवरचा इतिहास आहे, अनुभव आहे.

प्रश्न ७– सुप्रिम कोर्टाचा निकाल विरोधात का गेला ?

उत्तर – स्वतःला निवडणुक प्रचारापुरते ओबीसी म्हणवणाऱ्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी २०१० ते २०१४ याकाळात मनमोहन सिंग सरकारने केलेल्या शैक्षणिक , आर्थिक व सामाजिक जनगणनेचे आकडे गेली सात वर्षे रेशीमबागेच्या आदेशावरून दाबून ठेवलेत. २०१४ ते २०१९ याकाळात मुख्यमंत्री असलेल्या फडणविसांनी ओबीसी, भटकेविमुक्त, विमाप्र यांची जनगणना केली नाही, म्हणून हा निकाल विरोधात गेला. हे पाप मोदी–फडणविसांचे आहे !

प्रश्न ८– आता पुढे काय ?

उत्तर – सध्याच्या महाराष्ट्रातील मविआ सरकारने ताबडतोब ओबीसी आयोग नेमून ओबीसी, विजाभज, विमाप्र यांची जणगणना करावी व यांचे २७ टक्के राजकीय आरक्षण पुन्हा द्यावे.

प्रश्न ९– सुप्रिम कोर्टाने कोणत्या तीन अटी घातलेल्या आहेत ?

उत्तर – 12. Be that as it may, it is indisputable that the triple test/conditions required to be complied by the State before reserving seats in the local bodies for OBCs has not been done so far. To wit, (1) to set up a dedicated Commission to conduct contemporaneous rigorous empirical inquiry into the nature and implications of the backwardness quantity in local bodies, within the State; (2) to specify the proportion of reservation required to be provisioned local body wise in light of recommendations of the Commission, so as not to fall foul of overbreadth; and (3) in any case such reservation shall not exceed aggregate of 50 per cent of the total seats reserved in favour of SCs/STs/OBCs taken together. In a given local body, the space for providing such reservation in favour of OBCs may be available at the time of issuing election programme (notifications). However, that could be notified only upon fulfilling the aforementioned preconditions. Admittedly, the first step of establishing dedicated Commission to undertake rigorous empirical inquiry itself remains a mirage. To put it differently, it will not be open to respondents to justify the reservation for OBCs without fulfilling the triple test, referred to above.

१. राज्याने ओबीसी आयोग नेमून ओबीसींची जणगणना करावी.त्यांची लोकसंख्या,मागसपण आणि राजकीय प्रतिनिधित्व शोधावे.

२. आयोगाने शिफारस केलेले प्रतिनिधित्व जास्त असल्यामुळे संविधानाने सिवीच्च न्यायालयानें आखून दिलेली मर्यादा ओलांडली जाणार नाही याची दक्षता घ्यावी.आणि

३.कोणत्याही परिस्थितीत अनु. जाती, जमाती व हे समाज घटक ओबीसी, भटकेविमुक्त व विमाप्रें यांना सर्वांना मिळून दिलेले एकत्रित आरक्षण ५० टक्क्यांच्या वर जाता कामा नये, याची काळजी घ्यावी.

प्रश्न १०– हा निकाल तर आताच्या ठाकरे–पवार सरकारच्या काळात आला मग याला फडणविस जबाबदार कसे ?

उत्तर – हा निकाल जरी तीन महिन्यांपुर्वी आला व त्यावरची पुनर्विचार याचिका जरी दोन दिवसापुर्वी . फेटाळली गेली तरी हा निकाल ज्या कृष्णमुती निकालावर आधारित आहे तो निकाल फडणविसांच्या काळातला आहे. फडणविसांना हे माहित होते की ओबीसी, विजाभज, विमाप्र यांची जनगणना केल्याशिवाय हे आरक्षण टिकणार नाही, तरीही त्यांनी जनगणना केली नाही. कारण त्यांचा रिमोट कंट्रोल ज्यांच्या हाती होता तेच सामाजिक न्यायाच्या विरोधी, विषमतावादी, जातीयवादी, उच्च जातीवर्णवादी आहेत. हे लोक चोराच्या उलट्या बोंबा म्हणून काहीही बरळत असले तरी मूलतः हे आरक्षणविरोधी लोक आहेत.

**– प्रा. हरी नरके.**

# तंबाखू वर बंदी म्हणजे आरोग्यदायी जीवनाची संधी

तंबाखूच्या सेवनाने अनेक दुष्परिणाम तंबाखूच्या सेवनाने मानवी शरीरावर अनेक दुष्परिणाम होतात. त्यात प्रामुख्याने कॅन्सर म्हणजेच कर्करोग होतो. यात तोंडाचा कर्करोग, ओठाचा, जबड्याच्या, फुफुसाचा, घशाचा, पोटाचा, किडनीचा व मूत्राशयाचा कॅन्सर इत्यादी तंबाखू सेवनाने होतात. भारतात तंबाखू सेवनामुळे तोंडाचा कॅन्सर होणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे. ९० टक्के फुफ्फुसाचा कॅन्सर आणि इतर कॅन्सर होण्याचे कारण हे धूम्रपान आहे. तंबाखूमुळे छातीत दुखणे, हृदयविकार झटका येणे, रक्तवाहिन्याचे विकार इत्यादी रोग जडतात. जर धूम्रपान जास्त केले तर टी बी सुद्धा होऊ शकतो.

जितके जास्त धूम्रपान तेवढा जास्त टी बी माणसाला होतो. तंबाखू शरीरातील धमण्याच्या पापूर्द्याला नुकसान पोहचवतात. धूम्रपान किंवा तंबाखू हे अचानक रक्तदाब वाढविते तसेच हृदयाकडे जाणार रक्तपुरवठा कमी करते. धूम्रपानामुळे मधुमेह होण्याची शक्यता जास्त बळावते. तसेच रक्तातील कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी होत जाते. जी व्यक्ती धूम्रपान करते तिला हृदयरोग व पक्षाघात हा न धूम्रपान करणाऱ्या व्यक्तीच्या तीप्पटिने लवकर होतो. तंबाखूच्या सेवनामुळे ताकत कमी होते तंबाखूच्या सेवनामुळे शारीरिक ताकत कमी होते आणि त्यामुळे सहनशीलता ढासळते. तंबाखू सेवनाने तोंडाची दुर्गंधी, केसांची दुर्गंधी, डोळ्यांखाली काळेपणा येणे, दातांना इजा पोहोचणे हे परिणाम होतात. जर गरोदर स्त्री धूम्रपान करत असेल तर त्यांच्यात गर्भपाताच्या समस्या निर्माण होतात, मूल कमी वजनाचे भरते, बाळाचा अचानक मृत्यू देखील होऊ शकतो. तंबाखूच्या सेवनाने पुरुषांमध्ये नपुंसकत्व निर्माण होते. जगात दर आठ सेकंदात एका व्यक्तीचा मृत्यू धूम्रपान केल्यामुळे होतो.

एवढे दूरगामी दुष्परिणाम करणारे रोग होत असले तरी तंबाखू खाणारे मात्र याला डोळेझाकून सेवन करतात.आजची पिढी पूर्णपणे व्यसनाधीन धूम्रपान करणाऱ्या व्यक्तीच्या सोबत असणाऱ्या व्यक्तीलाही याचे दुष्परिणाम भोगावे लागतात. कारण सिगारेट ओढणारी व्यक्ती फक्त ३० टक्के धूर घेतो आणि उरलेला ७० टक्के धूर वातावरणात राहतो आणि इतरांवर परिणाम करतो याला अप्रत्यक्ष सेवन म्हणतात. एखादा व्यक्ती तंबाखू मळत असेल तर बाजूच्याला शिंका येतात हा तंबाकूचाच परिणाम आहे. याचा परिणाम लगेच समजत नाही तर याचे दूरगामी परिणाम होतात.

खास करून युवावर्गात सिगारेटची विशेष वेळी एन्ट्री होते. नात्यातील जबाबदाऱ्या आणि वाढत चाललेल्या अपेक्षा यामुळे आजची पिढी पूर्णपणे व्यसनाधीन असल्याची प्रचिती जागोजागी येत आहे. त्यांना मानसिक आधार कुठेच मिळत नाही मग ते व्यसनाच्या आहारी जातात.व्यसनाला अनेक कारणे मुलगी नाही म्हणाली, नापास झालं, दगा दिला, पार्टी, गम झाला, खुशी झाली कोणत्याही प्रसंगी फक्त आणि फक्त एकच उपाय मानतात आणि मग पी दारू –ओढ सिगारेट असे नको नको ते मार्गांचा अवलंब करताना दिसून येतात. खरंतर तरुण पिढी आजकाल खूपच व्यसनाधीन होत चालली आहे. यामुळे देशाची प्रगती होईल का ? यात शंकाच आहे. महाराष्ट्र शासनाने व्यसनमुक्तीसाठीअनेक योजना राबवल्या. पण नुसत्या योजना राबवून चालणार नाही तर त्यांची मानसिकता बदलण्याची गरज आहे. तंबाखू सोडल्यास अनेक फायदे तंबाखू सोडण्यास कधीच उशीर झालेला नसतो. तंबाकू जेंव्हा ही सोडला तेंव्हा त्यापासून होणाऱ्या दुष्परिणाम हे कमी होतील. तंबाखू सोडल्याने मानवाची शारीरिक आणि सामाजिक उन्नती होते. तंबाखू सोडल्यास हृदयरोग, उच्च रक्तदाब येणे हे धोके कमी होतात. तुम्ही धूम्रपान करत असल्यास त्याचा परिणाम सोबतच्यांवर होतो. आपल्यांवरच होतो तो होणार नाही. धूम्रपानामुळे होणारा नाहीसा होतो. तंबाखू सोडल्याने दात स्वच्छ व शुभ्र होतील. तंबाकू सोडल्याने खूप फायदे होतात. जसे तुम्ही तुमच्यावर नियंत्रण ठेऊ शकाल, आत्मशक्ती व आत्मविश्वास वाढेल. आज व यापुढे भविष्यात तुमी तुमच्या मुलांसाठी एक निरोगी पालक बनाल.तंबाखूविरोधी उपक्रम राबविण्याची गरज तंबाखूमुक्त भारत करण्यासाठी उपाययोजना ही तेवढीच ताकतीची करावी लागेल. आजची युवा पिढी व्यसनाच्या विळख्यात लवकर अडकत आहे.

शालेय स्तरावर तंबाखू विरोधी वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, पोस्टर स्पर्धा इत्यादी आयोजित करून प्रबोधन करता येईल. अशाप्रकारे शालेय स्तरातुन संस्कार केले गेले तर निरोगी, सदृढ, व्यसनमुक्त आणि बलशाली नागरिक नक्कीच घडतील.चला व्यसनमूक्त होऊ सुखी जीवनाचा ध्यास घेऊ सोडून धूम्रपान अन तंबाखू निरोगी मोकळा श्वास घेऊममम

**डॉ.अनिल आटे**
**जिल्हा मौखिक आरोग्य अधिकारी तथा जिल्हा सल्लागार,राष्ट्रीय तम्बाकू नियंत्रण कार्यक्रम गोंदिया जिल्हा.**

# स्त्री पुरोगामित्वाचा जागतिक दीपस्तंभ:राजमाता अहिल्याबाई होळकर

स्त्री आणि पुरुष विश्व निर्मितीपासून मानव जातीची दोन कल्याणकारी चाक असताना परिस्थिती व काळ सापेक्ष पुरुषप्रधान संस्कृतीतून स्त्रियांवर अनेक बंधने टाकण्यात आली. केवळ कुटुंबावरच नाही तर जगावर राज्य करण्याची क्षमता असलेली स्त्री बंदिस्त जीवन जगू लागली. याचा कळस गाठला गेला तो मध्ययुगात. भारतीय संस्कृती मध्ये स्त्रियांचे जीवन संकुचित करणाऱ्या परंपरा, धारणा, प्रथा विकसित झाल्या. त्यामुळे स्त्रियांना त्यांच्या कर्तुत्वाच्या क्षमताच जगासमोर मांडता आल्या नाही. स्त्री काय करू शकते याचा अंदाज सुद्धा ती करू शकत नव्हती कारण तिची वैचारिक ठेवण संस्काराच्या नावावर इतकी संकुचित केली जात होती की, ती स्वतःच्या क्षमताच विसरून जात होती... अधिकार शुन्य, भावना शुन्य, विचार शुन्य होऊन इशाऱ्यावर जगणारा प्राणी या रुपाने जीवन घालवत होती.

याला छेद स्वतःच्या जीवनापासून देत सामाजिक क्रांतीचं प्रथम पाऊल राजमाता अहिल्याबाई होळकर यांनी टाकलं. आपल्या शूरवीर पती खंडेराव यांच्या कुंभेरीच्या रनातील मृत्यूनंतर सती न जाता तत्कालीन धर्ममार्तडांचा विरोध पत्करला. सामाजिक निर्भत्सना, स्वकीय आणि परकीय यांच्या कडून होणारा धिक्कार सहन केला. जणू काही स्त्रियांच्या गुलाममुक्तीचा जाहीरनामा स्वतःच्या जगण्यातून अमलात आणला.

स्त्रियांच्या मनगटातील बळ जाणारे पुरोगामी विचारांचे कर्तबगार सासरे तथा मराठेशाहीतील जेष्ठ सुभेदार मल्हारराव होळकर यांनी निर्माण केलेल्या इंदोर राज्याचा आधारस्तंभ अहिल्याबाई बनल्या. जनकल्याणाच्या दृष्टीने समाज निर्मितीसाठी राज्याची सत्ता स्वतःच्या हातात घेतली. राजसत्तेचा विश्वस्त या नात्याने सत्तेचा वापर केला. मला मिळालेली राजसत्ता कल्याणासाठी वापरायची असून यासंबंधीचा जवाब मला ईश्वराप्रती द्यायचा आहे, हा दृष्टी भाव त्यांनी अखंड जीवनामध्ये आत्मसात केला होता.


त्यांनी राजसत्तेचा वापर स्त्री सुद्धा करु शकते, हे दाखवून देण्यासाठी आणि खऱ्या अर्थाने पुरोगामित्वाचा वसा घेऊन प्रतिगामी व्यवस्थेला लाथ मारली. सलग २८ वर्षे राज्यकारभार केला. त्या अठ्ठावीस वर्षात धर्मसत्ता, राजसत्ता व अर्थसत्ता यांना दैविक, धार्मिक नाही तर आध्यात्मिक अधिष्ठान देऊन सर्व सत्तांचा वापर जनकल्याणासाठी कशा प्रकारे केला जाऊ शकतो, याचा एकमेव आदर्श भारतीय भूमीतून जगासमोर घातला. त्यामुळेच त्यांची तुलना केवळ रशियाची राणी कथरिना व इंग्लंडची राणी एलिझाबेथ यांच्याशी केली जावू शकते..

सलग २८ वर्षे शांततामय राज्यकारभार, कुठेही बंड नाही वा विद्रोह नाही. न्यायप्रियता या गुणामुळे राजसत्तेची जरब नाही तर त्यासंबंधी जनते मध्ये निर्माण झालेला आत्मविश्वास हीच त्यांच्या राज्याची खरी ताकद होती. त्यामुळे शांततामय राज्यात सातत्याने चालणारे जनकल्याणाचे कार्य, परधर्म सहिष्णुता, धर्मनिरपेक्षता, समाज कल्याण, प्राणीमात्रांवर दया, भुकेल्याला अन्न, समृद्ध शेती, जलद व सुलभ न्याय, वंचित उपेक्षितांना अभय, निर्धनां पासून धनवाना पर्यंत सर्वांनाच जगण्याचा अधिकार, वाटसरूंना व व्यापाऱ्यांना लुटारू पासून अभय, त्यांच्यासाठी सोयी सुविधा हे सर्व लोकमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या २८ वर्षातील राज्यकारभाराचं वैशिष्ट्य असल्याचे लक्षात येते.

राज्याला दुश्मन असणारच नाही, याची दक्षता घेत असतानाच सर्व प्रश्न शांततामय मार्गाने सोडवण्यावर राज्यात भर दिला जात होता. असं असलं तरी वेळप्रसंगी कामी यावी यादृष्टीने त्यांची सैन्य व्यवस्था सुद्धा मजबूत होती, दारूगोळा, तोफखाने यांनी सुसज्ज असलेली सैनिकी व्यवस्था सुद्धा अहिल्याबाई होळकर यांच्या कडे होती. एवढेच नाही तर जगाच्या पाठीवर महिलांची फौज निर्माण करणारी राज्यकती म्हणून अहिल्याबाई होळकर यांचा उल्लेख करणे आवश्यक ठरते. कारण त्यांनी प्रशिक्षित महिलांची फौज तयार केली होती. त्यांनी स्वतःच्या हातात शस्त्र घेऊन तशा प्रेरणासंपन्न स्त्रियांना त्यांच्यातील बळाची जाणिव करून देत रनांगणात उतरविलं. हे त्यांच क्रांतिकारक पराक्रमी पाऊल त्यांच्या पुरोगामित्वाचं महत्त्वाचं उदाहरण आहे.

राज्यकर्त्यांकडे अपेक्षित असलेला मुत्सद्दीपणा, हजरजबाबीपणा, पुरुषाची बरोबरी करणारं शूरत्व व जगातील सर्व प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडवण्यासाठी आवश?यक असलेलं अध्यात्मिक अधिष्ठान अहिल्याबाईच्या अंगी होतं. म्हणूनच कुठल्याही परिस्थितीमध्ये न डगमगता सर्व प्रश्नांवर त्यांनी सहज तोडगा काढल्याची अनेक उदाहरणे आपल्याला मिळतात.

स्त्रियांविषयी पारंपारिक दृष्टीकोन असलेला पेशवा राघोबा दादा जेव्हा इंदोर संस्थान गिळंकृत करण्यासाठी चाल करून आला त्यावेळी जो मुत्सद्दीपणा राजमाता अहिल्याबाई होळकरांनी दाखविला, त्याला जगाच्या पाठीवर तोड नाही..




अहिल्याबाईनी राघोबाला संदेश पाठविला, "तुम्ही, मी बाई माणूस म्हणून आपण माझ्यावर चाल करून आलात, रणांगणात मी हरली तर तुमचा नावलौकिक वाढणार नाही परंतु तुम्ही हरलात तर जगात नाक दाखवायला सुद्धा जागा राहणार नाही." हे ऐकताच राघोबा दादा पेशव्यांना अहिल्याबाईच्या इराद्यांची जाणीव झाली आणि त्यांनी आपली धोरणं बदलविली.

अशा प्रकारे शत्रुला रणांगणात नाही तर मनातून हरविला पाहिजे, ही जी युद्धनीती अहिल्याबाईनी राघोबादादांच्या बाबतीत वापरली त्याचा परिणाम राघोबादादांनी आपलं सैन्य माघारी पाठवून अप्रत्यक्षपणे शरणागती पत्करली.. आणि अहिल्याबाईच्या दुःखाचे (पुत्र वियोगाचे)भांडवल करीत तो त्यांना भेटायला आला. अशा रणातून नाही तर मनातून शरण आलेल्या शत्रूला सुद्धा सन्मानजनक वागणूक देऊन अहिल्याबाईनी आपल्या महिला राज्यकर्तीच्या राज्याच्या गुणवत्तेचा परिचय करून दिला. हा सुद्धा अहिल्याबाईच्या पुरोगामित्वाचा, वैचारिक प्रगल्भतेचा विजय होता. पुरुष वर्चस्ववादी, मनगटवादी मनोवृत्तीला स्त्रियांच्या मन आणि बुद्धी ची ताकद दाखवून दिली....

मानवी जीवन आणि दुःख यांचं एक नातं असतं. असं असलं तरी जेवढी अहिल्याबाईच्या जीवनामध्ये दुःखाची शृंखला दिसून येते तेवढी क्वचितच इतरांच्या जीवनामध्ये आलेली असेल.

शूरवीर पती खंडेराव, पितृतुल्य सासरे सुभेदार मल्हारराव, सासू गौतमाबाई, मुलगा, जावई, मुलगी, नातू अशी पाठोपाठ रक्त नात्यातील स्वकीय माणसांच्या मृत्यूची शृंखला अहिल्याबाईनी अनुभवली. त्या सर्वांच दुःख पदरात घालून हा देह जनकल्याणासाठी वापरायचा, या एकाच ध्येयाने त्या श्वास घेत राहिल्या. त्यांच्या प्रत्येक श्वासाला जन कल्याणाचा ध्यास होता. त्यामुळेच त्यांनी आपल्या दुःखाचं कधीच भांडवल केलं नाही. यामध्ये अहिल्याबाईच्या जीवनात असलेली दृढनिश्चयता, विरक्त जीवन, पुरोगामित्व आजच्या पिढीला मार्गदर्शन करून जातं.....

भुकेलेल्याला अन्न, हाताला काम, आणि कामाला दाम, या अहिल्याबाईच्या परोपकारी धोरणातून "सर्व सुखे नु सन्तु, सर्वे सन्तु निरामया!" याप्रमाणे सर्वांना जगण्याचा अधिकार दिला व तशा प्रकारची परिस्थिती राज्यामध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न राजमाता अहिल्याबाई होळकरांनी केला. त्यामुळे त्यांच्या राज्याला कल्याणकारी राज्याचं स्वरूप आलेलं होतं. त्यांचे राज्य निर्धनांपासून धनवाना पर्यंत सर्वांनाच समान अधिकार देत होतं.... त्यामुळेच त्यांनी आधुनिक कल्याणकारी राज्याचा पाया घालण्याचं काम व तशा प्रकारची प्रेरणा त्याने निर्माण केली. ही प्रेरणा राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जीवन चरित्रातून मिळते.

अशाप्रकारे प्रेरणास्थान असलेले अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र अनिष्ट प्रथा परंपरा यांना लाथाडून नव्याने जगण्याची ऊर्जा निर्माण करतं. सर्व दुःखांवर मात करीत नवविचारांना संजीवनी देतं. जगण्याला नवा आयाम देतं, दुःखमय जीवनात सुखाचे क्षण शोधायला शिकवतं. परोपकारी भावनेने जगताना कुठलाही विकार मनाला ग्रासणार नाही यासाठी मनोनिग्रही जीवन जगण्यासाठी प्रेरणा देतं.. सर्व धर्म समभाव ठेवून निरंकार ईश्वराप्रती म्हणजेच अलौकिक शक्ती प्रति समर्पित भावनेनी जगण्यासाठी तशा प्रकारची शक्ती प्रदान करतं.... असं ते जगाच्या पाठीवरील एकमेव व्यक्तित्व म्हणजे राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर..... केवळ भारतालाच नाही तर समस्त विश्वातील मानव जातीला पुरोगामित्वाची प्रेरणा देण्यासाठी दीपस्तंभाचं काम करतंय अशा व्यक्तित्वाच्या विचार व कार्य यांना त्यांच्या ३१ मे रोजी पार पडलेल्या जयंतीनिमित्ताने विनम्र अभिवादन.

**डॉ. प्रभाकर लोंढे**
**गोंदिया ९६७३३८६९६३**

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# जि.प.शाळांना महावितरणचा झटका

## वीज बिलासाठी लोकसहभागाची जुळवाजुळव: शासन स्तरावर निधीची तरतूद नाही

**गोंदिया:** जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांकडून सार्वजनिक सेवा दराने वीजबिल आकारले जात आहे. या शाळांना आर्थिक उत्पन्नाचे दुसरे स्त्रोत नसून शासनस्तरावरही वीज बिल भरण्यासाठी आर्थिक तरतूद नसल्याने जिल्हा परिषद शाळांची आर्थिक घुसमट सुरु आहे. एकीकडे वाढत्या स्पर्धात्मक युगात आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षक व शाळ) व्यवस्थापन समित्या लोकसहभागातून पैसे खर्च करुन शाळांना सुविधा पुरविण्यासाठी धडपड करीत असताना दुसरीकडे मात्र वीज वितरण कंपनी शाळांना सार्वजनिक सेवा बिल (एलटीएक्सबी) आकारुन झटका देत आहे.



आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर हा केवळ शहरी, खासगी शाळांची मक्तेदारी नसावी यासाठी शासनाने खेडेगाव, आदिवासीबहूल क्षेत्र व दुर्गम भागातील शाळांनाही डिजीटल केले. प्रगत शैक्षणिक धोरणात डिजीटल शाळा, ई-लर्निंग, व्हर्चुअल क्लासरुमसारख्या संकल्पना शिक्षण विभाग राबवत आहे. शेकडो गावांमध्ये शिक्षक व गावकऱ्यांच्या प्रयत्नातून तसेच विविध सामाजिक संस्थाच्या मदतीने शाळांमध्ये संगणक प्रोजेक्टर टेलिव्हीजन यासारख्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. मात्र वीज वितरण कंपनीकडून शाळांना सार्वजनिक सेवा बिल देत असून देण्यात येणाऱ्या मासिक बिलात स्थिर आकाराच्या नावाने तब्बल ३१० रुपये वसूल केले जात आहेत. अनेक शाळांची पटसंख्या कमी असते. शिक्षक कशी तरी तडजोड करुन विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी डिजीटल तंत्राचा वापर करतात. मात्र प्रत्यक्षात भारनियमन सुरु असताना स्थिर आकाराच्या नावाखाली दरमहा ३१० रुपये आकारले जात असल्याने कमी पटसंख्या असलेल्या शाळांना बिल भरणे कठीण झाले आहे.

### अनेक शाळांची बत्तीगुल

आधीच सर्व शिक्षा अभियान अंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानाला कात्री लावण्यात आल्याने शिक्षकांना स्वखर्चातून वीज बिल भरण्याची वेळ आली आहे. अवाढव्य वीज बिल भरणे शक्य नसल्यामुळे वीज वितरण कंपनीस मिटर जमा करुन शाळांचा वीज पुरवठा खंडीत केल्याची माहिती आहे. परिणामी या शाळा अंधारात आहे. तर प्रोजेक्टरसारख्या महागड्या वस्तू धुळ. खात पडलेल्या असल्याचे चित्र आहे.

### अनुदानाला कात्री

जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या बहुतांशी शाळा डिजीटल आहेत. या शाळांना पटसंख्येच्या आधारावर शासनाकडून अनुदान प्राप्त होते. १०० च्या वर पटसंख्येच्या शाळांना १५ हजार तर १०० च्या कमी पटसंख्या शाळांना १० हजार रुपये अनुदान दिले जाते. यापुर्वी शिक्षक अनुदान, शाळा अनुदान व देखभाल दुरुस्ती अनुदान बंद करुन शासन पटसंख्येच्या आधारावर शाळांना समग्र शिक्षा अभियान मार्फत संयुक्त अनुदान देत आहे. शाळांना मिळणाऱ्या अनुदानातून शालेय साहित्य, शाळा रंगरंगोटी, विद्युत बिल शाळेतील इतर ऑनलाईन कामे करावी लागतात. त्यामुळे प्राप्त होणाऱ्या अनुदानातून नेमका कोणता खर्च करावा असा प्रश्न शाळांसमोर निर्माण झाला आहे.

# सातगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात स्थायी डॉक्टर द्या

**सालेकसा:** तालुक्यातील अतिशय महत्त्वपूर्ण असलेल्या सातगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात स्थायी स्वरूपात एमबीबीएस डॉक्टर नसल्याने रुग्णांना त्रास सहन करवा लागत आहे. त्यामुळे २४ तास सेवा देणाऱ्या एमबीएसएस डॉक्टरची त्वरित नियुक्ती करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. सातगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात नेहमीच एमबीबीएस डॉक्टरची कमतरता दिसून येते. तालुक्यात सालेकसा नंतर सातगाव केंद्राचे क्षेत्र मोठे आहे. सातगाव अंतर्गत भजेपार, मक्काटोला, धानोली, सातगाव, गिरोला ही उपकेंद्रे आहेत. तर गांधीटोला येथे आयुर्वेदिक दवाखाना आहे. असे असताना येथे एमबीबीएस डॉक्टर नियुक्त करण्यात आले नाही. वैद्यकीय अधिकारी डॉ. चाटे यांचे स्थानांतरण झाल्यानंतर एमबीबीएस डॉक्टरची नियुक्ती न झाल्याने



परिसरातील नागरिकांना खाजगी दवाखान्यात उपचाराकरिता जावे लागते. सध्या आरोग्य केंद्रात दोन डॉक्टर नियुक्त केले आहेत.

त्यापैकी एकही डॉक्टर एमबीबीएस नाही. डॉ. अनिल खोडणकर यांच्याकडे केंद्राचा प्रभार आहे. त्यांच्याकडे तालुका वैद्यकीय अधिकाऱ्याचा कार्यभार असल्याने कामाचा व्याप अधिक आहे. तर डॉ. किरण सोमानी यांची गांधीटोला येथील आयुर्वेदिक दवाखान्यात नियुक्ती असली तरी ते सातगाव येथे सेवा देतात. डॉ. बोपचे यांची सातगाव केंद्रात नियुक्ती आहे. असे असले तरी स्थायी डॉक्टर नाही व त्यात एमबीबीएस पदवीधारक नाही. रात्री-अपरात्री रुग्णांना येथे सेवा मिळत नसल्याने रुग्णाला खासगी दवाखान्यात उपचार घ्यावे लागतात. त्यामुळे रुग्ण नातेवाईकांना आर्थिक, मानसिक, शारीरीक त्रास सहन करावे लागते. याकडे जिल्हा आरोग्य विभागाने लक्ष देण्याची गरज आहे. सध्या कोरोनाचा काळ आहे.

साखरीटोला परिसरात कोरोना रुग्णांची संख्या शंभरी पार गेली आहे. अशा परिस्थितीत आरोगय केंद्राची सेवा जनतेला मिळणे महत्त्वाचे आहे. डॉक्टरकडे रुग्ण मोठ्या आशेने पाहतात. त्यामुळे सातगाव आरोग्य केंद्राला स्थायी एमबीबीएस डॉक्टर मिळेल का? असा प्रश्न परिसरातील जनतेने उपस्थित केला आहे.

# नगर परिषद कर्मचाऱ्यांचा कामबंद आंदोलनाचा इशारा




**आमगाव:** कोरोना संकटकाळात आपल्या जीवाची पर्वा न करता अहोरात्र सेवा देणाऱ्या आमगाव नगर परिषद कर्मचाऱ्यांना त्याच कार्यालयातील कर्मचारी त्रास देत असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. आम्हाला अपमानास्पद वागणूक मिळत असल्याने संबंधित अधिकाऱ्यांवर कार्यवाही न झाल्यास कामबंद आंदोलन करण्याचा इशाराही नगर परिषद आमगाव च्या कर्मचाऱ्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

आमगाव नगर परिषदनेहमी कोणत्या नी कोणत्या कारणाने विवादात असतेच. सध्या नगर परिषद चा न्यायालयीन प्रकरण सुरू असल्याने सर्व कारभार हा प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या हातात आहे. अशातच आमगाव नगर परिषद मधील कर्मचारी नागेश लोणारे हा इतर कर्मचाऱ्यांना, उद्धट पणे बोलणे, शिवीगाळ करणे व अपमानास्पद वागणूक देत असल्याचे सांगितले असून बाकीच्या कर्मचाऱ्यांनी नगर परिषद प्रशासकीय अधिकारी यांच्या मार्फत जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक याना निवेदन सादर केले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, नागेश लोणारे हा कर्मचाऱ्यांना मानसिक त्रास देत असून वेळोवेळी विनाकारण अपमानित करीत असतात. लोणारे यांच्या त्रासापासून आम्ही कर्मचारी वैतागले असून लोणारे यांच्याकडे काही महिन्यासाठी कार्यभार देण्यात आला होता त्याचा ते फायदा घेत आहेत त्यांच्या कडून तो कार्यभार काढून टाकण्यात यावा अन्यथा १० जून पासून अनिश्चित कालीन कामबंद आंदोलन करण्यात येईल असा इशाराही त्यानी निवेदनातुन प्रशासन नगर परिषद आमगाव यांना दिला आहे.

या वेळी निवेदन देतांनी श्रीकिसन उके, राजेश पांडे, दिपक भांडारकर, संदीप बावनथडे, दिलीप फुंडे, शैलेंद्र डोंगरे, ओमप्रकाश काटेखाये, मुकेश वाकले, रामेश्वर श्रीभद्री, राजेंद्र शिवणकर, कुलदीप पशीने, सुभाष बोरकर, रमेशपुरी वैकुंठी, ललक्ष्मीनारायण श्रीवास्तव, संजय चुटे माधवराव मुनेश्वर, कमलेश राऊत, तीलकसिंग परिहार, बिंदू शेंडे, शामराव बहेकार, इत्यादी उपस्थित होते.

# इयत्ता पहिलीकरिता ७७०८ बालकांची प्रवेश नोंदणी

**गोंदिया:** इयत्ता पहिलीपासून खऱ्या अर्थाने बालकांचे शिक्षण सुरु होते. जिल्ह्यात कोरोनाच्या सावटाखाली यंदा ३१ मे पर्यत ६७१ शाळांमध्ये इयत्ता पहिलीत प्रवेशाकरिता ७७०८ बालकांची नोंदणी झाली आहे. १५ जूनपर्यत नोंदणी प्रक्रिया सुरु राहणार असून १ जून या जागतिक पालक व आंतरराष्ट्रीय बालदिनी अधिकाधिक पालकांनी आपल्या पाल्याची प्रवेश नोंदणी करण्याचे आवाहन जिपच्या शिक्षण विभागाकडून केले होते.

मागील वर्षापासून कोरोना महामारीमुळे शिक्षण क्षेत्रही प्रभावित झाले. त्यामुळे पालकांमध्येही आपल्या पाल्याच्या शैक्षणिक प्रगतीविषयी चिंता निर्माण झाली होती. मात्र शिक्षण विभागाने २०२०-२१ मध्ये शाळाबाहेरची शाळा, शाळा बंद, शिक्षण सुरु, आभासी प्रश्नमंजुषा स्पर्धा, आभासी अभ्यासक्रम, गृहमाला, भरारी, टिली-मिली, एक गाव-एक बालरक्षक, मिशन शिक्षण हमी पत्रक, मिशन विटभट्टी असे विविध उपक्रम शिक्षण विभागाने राबवून विद्यार्थ्यांचे शाळेशी नाते टिकवून ठेवलेले आहे. चालू शैक्षणिक सत्रात विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये, यासाठी इयत्ता पहिलीत २० जूनपासून प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून १५ जूनपर्यत ही प्रक्रिया सुरु राहणार आहे. यातंर्गत ३१ मे पर्यत जिल्ह्यातील ६७१ शाळांमध्ये इयत्ता पहिलीकरिता ७७०८ बालकांची प्रवेश नोंदणी झालेली आहे. यात अर्जुनी मोर तालुक्यातील ८५ शाळेत १०७४ बालकांची प्रवेश नोंदणी, आमगाव ७२ शाळेत ७३३ बालक, देवरी ७६ शाळेत ५९६ बालक, गोंदिया १४४ शाळेत २०७४ बालक, गोरेगाव ६५ शाळेत ७३६ बालक, सडक अर्जुनी ८१ शाळेत ९५३ बालक,



सालेकसा ६५ शाळेत ५८४ बालक व तिरोडा तालुक्यातील ८३ शाळांमध्ये ९५८ बालकांची इयत्ता पहिलीकरिता प्रवेश नोंदणी झालेली आहे.

आपलं मूल हे शिकल पाहिजे असे प्रत्येक पालकांना वाटते. कोविड विषाणूचा प्रादुर्भाव लक्षात घेता शासनाच्या निर्देशाप्रमाणे २०२१-२२ मध्ये शाळा सुरु होतील. आगामी शैक्षणिक सत्रामध्ये मागील वर्षीप्रमाणे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कुठलाही खंड पडू दिला जाणार नाही. मुलांच्या व्यक्तिमत्वाच्या चांगल्या विकासासाठी, सर्वांगीण शिक्षणासाठी, बौध्दिक विकास तसेच चांगले नैतिक मूल्ये रुजविण्याच्या दृष्टीने आज, १ जून रोजी जागतिक पालक व आंतरराष्ट्रीय बालदिनी आपल्या बालकास शाळेत दाखल करण्याचे आवाहन जिपचे शिक्षणाधिकारी राजकुमार हिवरे व मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिपकुमार डांगे यांनी केले आहे.

# बांधकामाची ती तक्रार निरर्थक

**गोंदिया:** शहरातील शिवनगर ते रिंगरोडकडे जाणाऱ्या रस्त्यावर पुलाचे बांधकाम सुरु आहे. दरम्यान याबाबद वृत्तपत्राच्या आधारे तक्रार करुन बांधकाम थांबविण्याचा प्रयत्न करण्यात आला. ती तक्रार बिनबुडाची असून पुलाचे बांधकाम थांबवू नये, अशी मागणी शिवनगरवासीयांनी केली आहे. याबाबत नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.



शिवनगर ते रिंगरोडकडे जाणाऱ्या रस्त्यावर पुलाचे बांधकाम करण्यात यावे, अशी मागणी शिवनगरवासीयांनी १५ नोव्हेंबर २०१७ रोजी नगराध्यक्ष, तत्कालीन खासदार नाना पटोले, तत्कालीन राज्यमंत्री परिणय फुके यांच्याकडे निवेदनातून केली होती. दरम्यान पुलाच्या बांधकामास मंजुरी मिळाली व बांधकामाला सुरुवात झाली. मात्र, २५ मे २०२१ रोजी एका वृत्तपत्रात पुलाचे बांधकाम थांबविण्यात यावे, ते फक्त ले-आऊट धारकांचेच फायद्याचे काम आहे. अशी बातमी प्रकाशित करण्यात आली. ही बातमी खोटी असून बिनबुडाची आहे.

या पुलाच्या बांधकामामुळे शिवनगरातील १००-१२५ घरांच्या लोकांना लाभ होणार आहे. येथील नागरिकांना लांब अंतर कापून रिंग रोडवर जावे लागते. तो फेऱ्याचा अंतर जवळ-जवळ एक किलोमीटर कमी होणार आहे. त्यामुळे पुलाचे बांधकाम थांबवू नये, अशी मागणी शिवनगरवासीयांनी नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. निवेदन देतेवेळी व्ही.एस. जांभुळकर, आर,आर. नागवंशी, आर.एन. लांजेवार, एच.ए. मानकर, आर.एन. फरकुंडे, एस.एच. गोखे, रमेश टेंभरे, प्रीती टेंभरे, संगीता शिवणकर, डॉ. टेंभरे, खेमेंद्र कटरे, एस.एच. तुरकर आदी उपस्थित होते.

### गस्तीवर गेलेल्या वनरक्षकाचा मृतदेह तलावात आढळला

देवरी- देवरी वनविभाग कार्यालयात कार्यरत गस्तीवर गेलेल्या वनरक्षकाचा मृतदेह राजनडोंगरी क्षेत्रातील तलावात ३१ मे रोजी आढळून आला. योगेश विठ्ठल शेंडे (५४) रा.देवरी असे मृत वनरक्षकाचे नाव आहे. देवरी वनविभागातील वनरक्षक योगेश शेंडे हे ३० मे रोजी सकाळी राजनडोंगरी क्षेत्रातील वन परिसरात गस्तीवर गेले. मात्र ३१ मे रोजी सकाळपर्यत ते घरी परतले नाही. त्यामुळे त्यांच्या कुटूंबियांनी वनविभागचे कार्यालय, गावात व नातेवाईकांकडे त्यांचा शोध घेतला. मात्र ते सापडले नाही. दरम्यान त्यांच्या मुलाने ते कर्तव्यावर असलेल्या राजनडोंगरी वन क्षेत्रात वडीलांच्या मोबाईलचा माग घेत शोध घेतला असता राजनडोंगरी क्षेत्रातील तलावात त्यांचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच देवरी पोलिसांनी घटनास्थळ गाठले व योगेश शेंडे यांचा मृतदेह तलावाबाहेर काढला व शवविच्छेदनासाठी पाठविला. त्यांच्या मृत्यूचे मूळ कारण समोर आले नसले तरी त्यांनी विषप्राशन करुन आत्महत्या केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

# आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची कटंगी प्रकल्पात रंगीत तालीम

**गोंदिया:** मान्सूनपूर्व तयारी २०२१ च्या अनुषंगाने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण गोंदिया तर्फे पूर परिस्थितीमध्ये शोध बचाव कार्य संबंधाने गोरेगाव येथील कटंगी जलाशयामध्ये शानिवार २९ मे २०२१ रोजी शोध व बचाव कामाची रंगीत तालीम घेण्यात आली. मागील वर्षी २०२० मध्ये जिल्ह्यात आलेल्या पूर परिस्थिती लक्षात घेऊन यावर्षी जिल्हा प्रशासनाकडून प्रत्येक तालुक्यात नागरिकांसाठी शोध व बचाव प्रशिक्षण कार्यक्रम व पूरपरिस्थितीमध्ये सुरक्षा व बचाव बाबत कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे. पूर परिस्थितीमध्ये जीवित व वित्तीय हानीचे प्रभाव कमी करण्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण गोंदिया तर्फे सदर कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

त्यानुषंगाने नागरिकांना पूरपरिस्थितीमध्ये तात्काळ मदत पुरविण्यासाठी जिल्हा शोध व बचाव चमूतर्फे रंगीत तालीम कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमात नागपूर येथून आलेले मोजेस कॉन्ड्रा, निकेश चिखलोंडे, शोध बचाव पथकाचे सदस्य किशोर टेंभुर्णे, नरेश उके, राजकुमार बोपचे, जसवंत रहांगडाले, रवि भांडारकर, संदीप कराडे, दिनू दिप, इंद्रकुमार बिसेन चुंन्नीलाल मुटकुरे, चिंतामण गिरेपुंजे आदी उपस्थित होते. मान्सूनपूर्व तयारीच्या अनुषंगाने गावपातळीवर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आली आहे. तसेच हवामान खाते व पूर परिस्थिती संदर्भात नागरिकांना व्हाट्सअप गुपच्या माध्यमातून माहिती देण्याकरिता तालुका व गाव पातळीवर व्हाट्सअप गुप तयार करण्यात येत आहे.

# बारा किमी अंतरावर जाऊन विक्री करावे लागते धान

**सडक अर्जुनी :** तालुक्यातील महिला औद्योगिक संस्था मुरपार (राम) या संस्थेला धान खरेदीसाठी सात गाव असून मागिल १०. वर्षांपासून मुरपार(राम) पासून सात किमी. अंतरावर डव्वा येथील गोंदिया-कोहमारा राज्य मार्गावर राईस मील च्या गोदामात धान खरेदी केंद्र सुरू आहे. तसेच देवरी तालुक्यातील तालुका शेतकरी खरेदी विक्री संस्था देवरी ही संस्था ७-८ वर्षांपासून सडक अर्जुनी तालुक्यात धान खरेदी केंद्र पांढरी येथे चालवित आहे. पांढरी केंद्राकडे ८ गाव असून मागिल २-३ वर्षांपासून धान खरेदी कधी पांढरी केंद्रावर तर कधी पांढरी केंद्रापासून १० किमी अंतरावर गिरोला येथे धान खरेदी केली जाते. धान्यसाठ्याचा गोदाम नसतांनी कुणाचे अंगणात, गिरोला येथील राईस मील च्या पटांगणात सन २०२० मध्ये उघड्यावर मोजून ठेवले होते. यावर्षी रब्बी हंगामात केंद्र पांढरी असूनही धान खरेदी केंद्र १० किमी. अंतरावर गिरोला येथे सुरूआहे.

पांढरी, रेंगेपार या गावचे शेतकरी १०-१२ किमी. वर गिरोला येथे मजबूरन धान घेऊन जावे लागत आहे. तसेच गिरोला वरून हेटी येथील धान खरेदी केंद्र कोहमारा येथील एका खासगी संस्थेला देण्यात आले आहे. ही संस्था २-३ दिवस हेटी येथे धान खरेदी करुन गोदाम भरले सांगून हेटी येथील शेतकऱ्यांना कोहमारा येथे २०-२५ किमी.वर धान आणायला लावत आहे. विशेष म्हणजे, हेटी येथे गोदाम नसून गहाणे पाटील यांचे व्हरांड्यात व गोठ्यामध्ये साठवून ठेवल्या जाते.

या केंद्राला ५ गावे असून या गावातील शेतकऱ्यांना २०-२५ किमी.वर धान न्यावे लागते. तसेच यावर्षी रब्बी हंगामातील धान खरेदी करण्यासाठी मुंडीपार (ई) येथे मोर्या अटल अभिनव सहकारी संस्था कोहमारा/सडक अर्जुनी या संस्थेला धान खरेदी केंद्र देण्यात आले आहे. पण येथे धान खरेदी न करता ४ किमी वर घटेगाव येथे सुरू करण्यात आले आहे. मुंडीपार(ई) व घटेगाव येथे गोदामाची व्यवस्था नसून येथे धान खरेदी केंद्र मंजूर करण्यात आले. वास्तविक धान खरेदी केंद्र ज्या गावी मंजूर करण्यात आले त्या गावी धान खरेदी करायला पाहिजे. १०-१२ ते २०-२५ किमी वर धान न्यावा लागत असल्याने शेतकऱ्यांना वाहनाचा अतिरिक्त भाडा द्यावा लागत आहे. आणि हा खर्च शेतकऱ्यांच्या माथी पडत असून धानाचे विक्रीपासून मिळणारा फायदा कमी होत आहे. याला कारणीभूत लोकप्रतिनिधी, शासन व प्रशासन आहेत. लोकप्रतिनिधींसह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी सुद्धा भावनाशून्य



कृती करून वेळ मारून नेत आहेत. आज बरोबर धान खरेदी सुरू न झाल्याने शेतकऱ्यांवर कुणी धान घेता का धान ! अशी म्हणण्याची पाळी आली आहे.लोकशाही वार्ता /सडक अर्जुनी तालुक्यातील शेतकऱ्यांची मोठी अडचण झाली आहे. शेतक-यांना १०-१२ किमी दूर जावून रब्बी हंगामातील धान विक्री करावे लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अधिकचा खर्च करावा लागणार आहे. या खर्चामुळे त्यांच्या पदरी काय पडेल असा प्रश्न शेतकरी विचारत आहेत. सध्या गोदाम खाली नसल्याने शेतकरी धान घेऊन खरेदी केंद्रावर पोहोचत आहेत. आल्यानंतर पुन्हा परत जावे लागत आहे. जेव्हा गोदाम खाली होईल तेव्हा पुन्हा धान आणावे लागेल.

शेतकऱ्यांना हा अधिकचा अतिरिक्त खर्च उचलावा लागत आहे. शासनाच्या चुकीच्या निर्णयामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे. शासनाने रब्बी हंगामातील धान खरेदीसाठी शासकीय आधारभूत धान खरेदी केंद्राचे उद्घाटन करुन लोकप्रतिनिधींनी फोटोसेशन केले. मात्र प्रत्यक्षात धान खरेदी सुरूझाली नाही. जिल्ह्यातील सडक अर्जुनी तालुक्यातील धान खरेदी केंद्रातील गाव विक्रीचा धंदा मार्केटिंग फेडरेशनच्या अधिकारी व जिल्हा अधिकारी यांचे कार्यालयातून मागिल २-३ वर्षांपासून सुरू आहे. वास्तविक धान खरेदी केंद्र हे मुख्य मोठ्या गावात द्यायला पाहिजे. पण अधिकारी व व्यापारी कार्यालयात बसून व्यापारी मागेल त्या गावात आणि व्यापाऱ्याच्या सांगण्यावरून गाव किमी. लिहून खासगी संस्थांना धान खरेदी केंद्र देतात. मोक्यावर गोदाम त्या केंद्रावरून किती किमी.वर गाव आहे ते न पाहता ८-१० किमी अंतर गावांना धान खरेदी केंद्रापासून २-३ किमीवर दाखवून धान खरेदी केंद्र देण्यात येते. राजकारणी व व्यापाऱ्यांच्या दावणीला बांधलेले अधिकाऱ्यांमुळे शेतकऱ्यांची मुसंडी होत आहे. एकीकडे जेथे धान खरेदी केंद्र आहेत त्याठिकाणी धान न मोजता मंजूर झालेल्या धान खरेदी केंद्रापासून १०-१२ ते २०-२५ किमी. अंतरावर शेतकऱ्यांना धान आणायला सांगतात.

ज्या शेतकऱ्यांकडे स्वत: चे साधन म्हणजे ट्रक्टर आहेत ते शेतकरी घेऊन जातात. मात्र, ज्या शेतकऱ्यांकडे साधन नाही असे शेतकरी भाड्याचे वाहन करून नेतात किंवा खाजगी व्यापा-याला १३५० रुपये क्विंटल भावाने धान विकतात. यात शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसतो. शेतकरी १८६८ रुपये हमीभाव व ७०० रुपये बोनससाठी धान खरेदी केंद्रावर घेऊन जातात. पण गरिब व मध्यम वर्गीय शेतकऱ्यांकडे साधी बैलबंडी नसून भाड्याचे ट्रक्टरने धान पेरणी,मळणी कशी तरी करतो. पण, शेतकऱ्यांची व्यथा शासन व प्रशासनाला दिसत नाही.

रब्बी हंगामातील धान खरेदी शेतकऱ्यांसाठी फोल ठरत आहे. शेतकऱ्यांचा धान शेतातून घरी पोहचला आहे. मात्र, अजूनही धान खरेदी सुरूझाली नसून शासनाकडून फक्त धान खरेदी केंद्र सुरू केल्याचा देखावा निर्माण करण्यात आला आहे. त्यामुळे शेतकरी नाहक भरडला जात आहे.

जरी शासनाने १८६८ रुपये दराने धान्य खरेदी करण्याचे नियोजन केले आहे, तरी धान खरेदी सुरू झाले नसल्याने शेतकऱ्यांना १३५०-१४०० रुपए दराने व्यापाऱ्यांना विकावे लागत आहे. ही शेतकऱ्यांची क्रूर थट्टा आहे. मुख्य म्हणजे यात शासनाचे नियोजन फसल्याचे समोर येत आहे.

## खरिपातील १२५ कोटी क्विंटल धान पडून; उन्हाळी धान खरेदी वांद्यात

**गोंदिया:** खरीप हंगामात खरेदी करण्यात आलेल्या धानाची अद्यापही उचल न झाल्याने उन्हाळी हंगामातील धान खरेदी वांद्यातआली आहे. मिलर्सच्या मागण्या मंजूर न झाल्याने त्यांनी धानाची उचल करण्यास नकार दिला आहे. धानाच्या भरडाईवरील तुटीचा विचार करता २०० रुपये प्रति क्विंटल अनुदान शासनाने द्यावे, तरच धानाची भरडाई करू असा पवित्र राईस मिलर्सनी घेतल्याने उन्हाळी धान खरेदीवर संकटाचे ढग निर्माण झाले आहे. सत्ताधारी नेते, लोकप्रतिनिधी केंद्राच्या उद्घाटनातच धन्यता मानत आहेत.

फेब्रुवारी महिन्यापासून मिलर्स यांनी तांदळाच्या तुटी संदर्भात अन्न व पुरवठा विभाग, शासनाकडे पत्रव्यवहार केला होता. त्यांच्या काही मागण्या घेऊन निवेदनही दिले होते. मात्र शासनाने केवळ बैठका घेऊन वेळ मारून नेली.

केंद्र शासनाचा हमीभाव योजनेनुसार दोन्ही हंगामात जिल्हा पणन कार्यालय व आदिवासी विकास महामंडळांतर्गत धानाची खरेदी होते. गत खरीप हंगामात पूर्व विदर्भात सुमारे १२५ कोटी क्विंटल धान खरेदी झाली. पैकी १ टक्केही धानाची उचल झालेली नाही. सर्वच गोदामे भरून आहेत तर लाखो क्विंटल धान आजही उघड्यावर भरडाईच्या प्रतीक्षेत आहे. गतवर्षी जून अखेरपर्यत खरेदी झालेल्या धानाची संपूर्ण भरडाई झाली होती. यंदा खरीप हंगामात खरेदी करण्यात आलेल्या धानाला उतारा कमी आहे. त्यातच करारानुसार ६७ टक्के तांदूळ शासनाला मिलर्सनी देणे बंधनकारक आहे.

तांदळाला उतारा कमी असल्याने प्रति क्विंटल २० किलोची तुट मिलर्सना येत आहे. हे तुट सोसणारी नसल्याने मिलर्सनी २०० रुपये प्रति क्विंटल अनुदान देण्याची मागणी शासनाला केली होती. १२ मे रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत १०० रुपये प्रति क्विंटल अनुदान जाहीर करण्यात आले तसेच केंद्र शासनाच्या १० रुपये प्रति क्विंटल धान भरडाई दरा व्यतिरिक्त राज्य शासनाकडून ४० रुपये प्रति क्विंटल अनुदान जाहीर केले. यासाठी २४४ कोटी रुपये खर्चास मान्यताही देण्यात आली. मिलर्सना १०० रुपये नुकसान सहन करावा लागत असल्याने ते धानाची उचल न करण्याचा भूमिकेवर ठाम आहेत.

शासन आणि स्थानिक लोकप्रतिनिधी धानाच्या भांडण संदर्भात तोडगा निघाल्याचे सांगत असले तरी परिस्थिती मात्र वेगळीच आहे. हे सत्य नाकारता येत नाही. अद्यापही खरिपातील धानाची उचल झाली नसल्याने उन्हाळी हंगामातील धान खरेदी संकटात आहे.

### शासनाने २०० रुपये प्रति क्विंटल अनुदान द्यावे - अग्रवाल

गत हंगामात धानावर रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने तांदूळ तुटत आहे. त्यातच उताराही ५ ते ६ टक्क्यांनी कमी येत आहे. एका क्विंटलवर २०७ रुपये नुकसान मिलर्सना सोसावा लागणार आहे. शासनाची यंदाची धान भरडाई परवडणारी नाही. शासनाने किमान २०० रुपये प्रति क्विंटल अनुदान दिल्यास धानाची उचल करून भरडाई करणे शक्य असल्याचे गोंदिया राईस मिल असोसिएशनचे अध्यक्ष अशोक अग्रवाल यांनी सांगितले.

# पोलिसांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल

## त्या आरोपीचा मृत्यू मेंदूत रक्त गोठल्याने



आमगाव: येथील जिल्हा परिषद शाळेतील साहित्य चोरीच्या प्रकरणातील आरोपी राजकुमार धाती (३०) रा. कुंभारटोली याला पोलिसांनी बेदम मारहाण केली. यातच त्याच्या मृत्यू झाला. डोक्याला गंभीर दुखापत झाल्यामुळे मेंदूत रक्त गोठून मत्यू झाल्याचे राजकुमारच्या मृतदेहाच्या उत्तरीय तपासणी अहवालात म्हटले आहे. आमगाव पोलिस ठाण्यात राजकुमारला पट्टा व लाकडी दांड्याने मारहाण झाल्याचे सीआयडीच्या तपासात पुढे आले आहे. राजकुमारच्या डाव्या कानाच्या व डाव्या डोळ्याच्यावर १३ सें.मी. गुणीला ६ सें.मी. एवढी जखम होती. पाठीमागे छोट्या मेंदूजवळ १२ सें.मी. लांब व ६ सें.मी. रुंद, अशी जखम होती. मारहाणीमुळे डोक्यात सूज आली व मेंदूत रक्त गोठले. त्यामुळे राजकुमारचा मृत्यू झाला असल्याचे शव विच्छेदन अहवालात म्हटले आहे.

उत्तरीय तपासणीत डॉक्टरांनी राजकुमारच्या शरीरावरील जखमा मोजून काढल्या असता त्याच्या शरीरावर २७ जखमा होत्या. इन्क्वेस्ट पंचनाम्यात राजकुमारच्या डाव्या गालाच्या वरच्या बाजूला मुका मार होता. डाव्या हाताच्या टोंगळ्यावर जुनी जखम, डाव्या हाताच्या खांद्याच्या खालच्या बाजूला मुका मार असल्याचे अहवालात सांगीतले आहे. डाव्या हाताच्या मनगटावर हाताचा खालचा भाग सुजलेला होता. उजव्या हाताच्या मनगटावर मुका मार होता. उजव्या कंबरेच्या बाजूला काळ्या रंगाचे जन्मजात निशाण तसेच दोन्ही पाय व गुडघ्यावर सूज होती. उजव्या पायाच्या गुडघ्याला खरचटलेले, जखमा लालसर-निळसर व दोन्ही तळपाय सुज-लेले होते. उजव्या पायाला तळपायाच्या वरच्या बाजूला घोट्याला खरचटलेले होते. पाठीचा भाग लालसर रंगाचा दिसत होता. उजव्या पायाच्या टोंगळ्याच्या मागच्या बाजूला मुका मार व सुज होती. डाव्या पायाच्या मागच्या बाजूला मुका मार व सूज होती. उजव्या कानाच्या पाठीमागच्या बाजूला सूज होती. मानेवर सूज, उजव्या हाताच्या कोनीला सूज व मुका मार होता. डाव्या हाताच्या कोनीवर सूज व मुका मार असल्याचे सीआयडीने इन्क्वेस्ट पंचनाम्यात म्हटले आहे.

चोरीच्या आरोपाखाली पकडण्यात आलेल्या चोरट्यांपैकी एका आरोपीचा मृत्यू २० मे रोजी आमगाव पोलिस कोठडीत झाला होता. हे प्रकरण आता पोलिसांच्या चांगलेच अंगलट आले असून मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन पोलिस निरीक्षकांसह चार पोलिस कर्मचा?यांना अटक करण्यात आला. याप्रकरणातील एक आर-ोपी फरार आहे. दरम्यान अटकेत असलेल्या आरोपींना न्यायालयाने आज, २८ मे रोजी २ जूनपर्यंत पोलिस कोठडी ठोठावली आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २० मे रोजी आमगाव येथील एका शाळेतील संगणक संच व अन्य साहित्य चोरी प्रकरणी चार आरोपींना अटक केली होती. यात मुख्य आरोपी राजकुमार अभयकुमार धुती, सुरेश धनराज राऊत, राजकुमार गोपीचंद मळकाम व एका अल्पवयीन बालकाचा समावेश होता.

२१ मे रोजी स्थानिक गुन्हे शाखेने या आरोपींना आमगाव पोलिस ठाण्याच्या हवाली केले. २२ मे रोजी पहाटे ५.१५ वाजता राजकुमार अभयकुमार धोती याचा संशयास्पद मृत्यू झाला. दरम्यान, राजकुमारचा मृत्यू हा स्वाभाविक नसून तो पोलिसाच्या अमानुष मारहाणीमुळे झाला, असा आरोप त्याच्या कुटुंबीयांनी केल्यानंतर या प्रकरणाला वेगळे वळण मिळाले. त्यामुळे येथील पोलिस निरीक्षकासह चौघांना निलंबित करून उच्चस्तरीय चौकशीचे आदेश देण्यात आले. तर उच्चस्तरीय चौकशीत पोलिस हवालदार दत्तात्रय कांबळे याचाही या प्रकरणात सहभाग असल्याचे समोर आले.

त्याच्यासह याप्रकरणात पोलिस निरीक्षक सुभाष चव्हाण, सहाय्यक पोलिस निरीक्षक महावीर जाधव, पोलिस हवालदार खेमराज खोबरागडे, अरुण ओके यांच्या विरोधात भांदविच्या कलम ३०२, ३३०, ३४ अंतर्गत २७ मे रोजी गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली आहे. तर याप्रकरणातील आणखी एक आरोपी पोलिस उपनिरीक्षक महावीर जाधव फरार आहे. या प्रकरणाचा तपास सीआयडीचे पोलिस अधीक्षक राजलक्ष्मी शिवणकर पोलीस निरीक्षक चंद्रकांत सूर्यवंशी करीत असून आज आरोपींना न्यायालयात उपस्थित केले असता न्यायालयाने आरोपींना २ जूनपर्यंत पोलिस कोठडी ठोठावली आहे.

# केंद्र सरकारच्या अपयशाच्या निषेधार्थ काँग्रेसचे धरणे आंदोलन



गोंदिया: केंद्रातील मोदी सरकारने ७ वर्षाचा कार्यकाळ पूर्ण केला आहे. मोदी सरकारच्या या ७ वर्षाच्या कार्यकाळात दे-शात काळोखच पसरला आहे. अर्थव्यवस्था, कोरोना महामारीशी लढा, वाढती माहगाई, सतत वाढणारे डिजेल- पेट्रोलचे दर, वाढती बेरोजगारी, शेतकऱ्यांचे आंदोलन अशा सर्व आघाड्यावर केंद्र सरकार अपयशी ठरलेले आहे. याचा निषेध म्हणून ३० मे रोजी गोंदिया जिल्हा काँग्रेसच्या वतीने जिल्हाध्यक्ष डॉ.एन.डी. किरसान यांचे नेतृत्वात धरणे आंदोलन करण्यात आले.

देशाची अर्थव्यवस्था तळाला गेलेली आहे. बांग्लादेश पेक्षा भारताची जी.डी.पी. कमी झालेली आहे. व प्रतिव्यक्ती वर्षीक उत्पनात आपला देश बांग्लादेशापेक्षा ही मागे गेलेला आहे. आज कोरोना महामारीच्या काळात ज्या देशांना आपण मदत करायला पाहिजे ते केनिया, भुटान सारखं छोटे देश आपल्या देशाला मदत करीत आहेत. या स्थीतीवर देशाला नेण्याचे काम केंद्रातील मोदी सरकाने केलेले आहे, अशी टिका काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ.एन.डी. किरसान यांनी केली.

नोटबंदी व चुकीच्या पद्धतीने लावण्यात आलेला जी.एस.टी. मुळे देशाची अर्थव्यवस्था ढासळली. गतवर्षी अचानक लावण्यात आलेल्या राष्ट्रीय ताळेबंदीमुळे अनेकांना त्रास सहन करावा लागला. प्रवासी मजुरांचे अत-ोनात हाल झाले. केंद्र सरकारने ताळेबंदी आधी त्यांची जाण्याची व्यवस्था ने कल्यामुळे त्यांना ५०० ते १००० कि.मी. पाई चालत जावे लागले. या प्रवासात अनेकांना जीव गमवावा लागला. कोविड साथ रोगाच्या नियंत्रणत सरकारने गाफ ीलपणा केला. दुसऱ्या लाटेबद्दल शास्त्रज्ञानी दिलेल्या सुचनाची अवहेलना करुन स्वत: प्रधानमंत्री, गृहमंत्री व केंद्रातील मंत्रीमडळ पाच राज्यांच्या निवडणुकीत व्यस्त राहिले. देशात हाहाकार माजला असतांना, ऑक्सीजनची कमतरते मुळे लोक मृत्यू पावत असतांना, रुग्णालयाची कमतरता व बंटसची अनुपलब्धतामुळे होणारा कोरोना रुग्णांचा मृत्यू, स्मशानात अंतिम संस्कार साठी लागलेल्या रांगा, सतत जळणाऱ्या चिता या सर्व माध्यमांव्दारे दृष्टी-गोचर होत असतांना सुध्दा प्रधानमंत्री बंगालची निवडणूक प्रतिष्ठेची करुन त्या ठिकाणी कोविडचे नियम धाब्यावर बसऊन रॅली व रोड शो करुन, गदी पाहून आनंदी होण्यातच वेळ घालवला व महामारीने यातना सहन करणाऱ्या नागरीकांकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे मृतांचा आकडा सतत वाढत गेला.

लसीकरणामध्ये दिरगाई व असुसुत्रता, राज्यांवर लसीकरणाची जवाबदारी टाकणे, केंद्राने संपूर्ण देशभर मोफत लसीकरण करणे गरजेचे असतांना ती जबाबदारी राज्यांवर सोप-वणे, लसींचे केंद्रासाठी वेगळे व राज्यांसाठी जात दर ठरवणे, आ-गाऊ लसीची बुकींग न करने, लस संशोधनासाठी फंड उपलब्ध न करने, दुसऱ्या लाटेबद्दल चेतावनी दिली असताना सुध्दा फेब्रुवारी मध्ये प्रधानमंत्री व आरोग्यमंत्री डॉ. हर्षवर्धन यांनी लसीकरणाशिवाय कोरोनावर मात केल्याची घोषणा करणे, वृत्त पत्राच्या व इतरमाध्यमांच्या हेडलाईन मॅनेजमेंट करने, लसींचा पुरेपुर साठा नसताना टिका उत्सव साजरा करण्यास लावणे १८ वर्षावरील युवकांना लसीकरण जाहीर करण्यांत घाई करणे इत्यादिमुळे कोरोनाचे संकट रोखण्यात सरकार अपयशी ठरले, असा संताप काँग्रेसच्या वतीने वतीने व्यक्त करण्यात आला. सर्वच बाबीवर मोदी सरकार अपयशी ठरली असून याचा निषेधही काँग्रेस केला आहे. आज, धरणे आंदोलन करून मोदी सरकारचा निषेध करण्यात आला.



राज्यपाल कोश्यारी यांच्याशी पत्रकारांच्या प्रश्नांवर चर्चा करीत "पत्रकारांना फन्टलाईन वर्कर म्हणून जाहीर करावे" या आणि अन्य मागण्यांबाबत आपण राज्य सरकारला पत्र लिहिणार असल्याचे राज्यपालांनी सांगितले.पत्रकार संघटनांचे पदाधिकारी देशमुख यांच्या नेतृत्वात भेटले यावेळी अन्य पत्रकार उपस्थित होते.

# गडकरींच्या समाजहिताचा संकल्प दृढ करण्याचा प्रयत्न-आ.फुके



ना.गडकरी याच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर

गोंदिया: देशातील कोरोना संसर्ग काळात आमचे आदर्श केंद्रीयमंत्री नितीन गडकरी हे निरंतर कोरोनायोद्धा म्हणून कार्य करीत आहेत. अनेक ठिकाणी ऑक्सिजन मशिन, सिलेंडर, औषधी मिळवून देण्यासोबतच विविध माध्यमातून कोरोनाच्या संकटाला नियंत्रीत करण्याचे कार्य केले आहे. आज त्यांच्या वाढदिवसाला रक्तदान शिबिराचे आयोजन करुन त्यांची समाजहितच्या संकल्पना दृढ करण्याचा प्रयत्न असल्याचे मत आ.डॉ.परिणय फुके यांनी केले.

ते येथील राणी सती लॉनमध्ये २७ मे रोजी केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात बोलत होते. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष केशवराव मनकर, माजी आ.रमेश कुथे, माजी आ.गोपालदास अग्रवाल, नगराध्यक्ष अशोक इंगळे, आ. विनोद अग्रवाल, नप उपाध्यक्ष शिव शर्मा, पोलिस अधीक्षक विश्व पानसरे, पोलिस निरीक्षक बंसोडे आदी मान्यवर उपस्थित होते. आ.फुके यावेळी म्हणाले, कोरोना संकटामुळे रुग्णालयात रक्ताचा तुटवडा निर्माण होत आहे. गरजुंना रक्तासाठी पायपीट करावी लागत आहे. यासाठी रक्तदानासाठी युवकांनी उत्स्फुर्तपणे पुढे येण्याची गरज आहे. ना.गडकरी यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन हा त्याचाच एक भाग असल्याचे ते म्हणाले.

दरम्यान, शिबिरात भाजप, भाजयुमो पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने रक्तदान करुन ३३ युनिट रक्त संकलीत केले. आयोजनासाठी भाजपा जिल्हा महामंत्री संजीव कुळकणी, तालुकाध्यक्ष धनलाल ठाकरे, शहर अध्यक्ष सुनील केलनका, भाजयुमो जिल्हाध्यक्ष ओम कटरे, संजय टेंभरे, नगरसेवक राजकुमार कुथे, पलाश लालवानी, चंद्रभान तरोणे, गोल्डी गावडे, धमेंद्र डोहरे, मिलिंद बागडे, दीपक बोबडे, बंटी पंचबुद्धे, गुड्डू चांदवानी, रॉकी नायक, मनीष पोपट, मनोज पटनायक, तिजेश गौतम, राकेश अग्रवाल, पारस पुरोहित आदी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# २४७५ शेतकऱ्यांकडून निधी परत करण्यास विलंब



गोंदिया: प्रधानमंत्री शेतकरी सन्मान योजनेतंर्गत शेतकऱ्यांना तीन हप्तयांमध्ये सहा हजार रुपये अर्थ सहाय्य दिले जात आहे. मात्र काही करदाते आणि शासकीय नोकरीवर असलेले शेतकरीही योजनेचा लाभ घेत असल्याची बाब केंद्र शासनाच्या लक्षात आली. यानंतर करदात्या शेतकऱ्यांकडून ही रक्कम परत मागविण्यासाठी शेतकऱ्यांना नोटीस बजाविण्यात आली होती. त्यानंतर ६९६ शेतकऱ्यांनी १ कोटी ३९ लाख २० हजार रुपये अर्थ सहाय्यची रक्कम शासनाकडे जमा केली आहे.

शेती करताना अनेकदा शेतकऱ्यांना आर्थिक अडचणी येतात. या अडचणी शेतकऱ्यांना दूर सारता याव्यात यासाठी केंद्र शासन शेतकऱ्यांना प्रधानमंत्री शेतकरी सन्मान योजनेतंर्गत वर्षाला तिन टप्प्यात प्रत्येकी २ हजार रुपये असे ६ हजार रुपये लाभाथी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करते. जिल्ह्यातील हजारो शेतकरी या योजनेचा लाभ घेतात. यात काही करदाते, शासकीय नोकरीत व १० हजार रुपयांपेक्षा अधिक निवृत्तीवुतनधारकांचा समावेश असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. सुमारे ३ हजार १७१ करदात्या शेतकऱ्यांकडून ३ कोटी ६७ लाख रुपये प्रशासनाला वसूल करायचे होते.

जिल्ह्यातील आठही तालुक्यातील तहसीलदारांच्या माध्यमातून संबंधित शेतकऱ्यांना नोटीस बजाविण्यात आले होते. त्यानंतर ६९६ शेतकऱ्यांनी १ कोटी ३९ लाख २० हजार रुपयांची रक्कम शासनाकडे जमा केली आहे. तर २४७५ शेतकऱ्यांकडून २ कोटी ३० लाख रुपयांची रक्कम परत होणे बाकी आहे. कोरोनाचा संसर्ग तसेच काही तांत्रिक अडचणीमुळे यात विलंब होत असल्याचे संबंधित अधिका?यांचे म्हणने आहे.

**हजारो शेतकरी लाभाच्या प्रतीक्षेत**

गोंदिया जिल्ह्यात २ लाख ७५ हजार शेतकरी आहेत. प्रधानमंत्री शेतकरी सन्मान योजनेतंर्गत जिल्ह्यातील २ लाख ६७ हजार शेतकरी पात्र ठरले आहेत. यापैकी २ हजारांवर शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर रकमेचा एकही हप्ता जमा झालेला नाही. त्यामुळे हे शेतकरी अद्यापही शासकीय कार्यालयाच्या पायऱ्या झिजवित आहेत. त्यामुळे या शेतकऱ्यांच्या खात्यावर योजनेचा हप्ता केव्हा जमा होणार? असा प्रश्न वंचीत शेतकऱ्यांकडून विचाला जात आहे.

## जिल्हा समन्वयकपदी तिजेश गौतम यांची निवड

गोंदिया,: सरपंच परिषद महाराष्ट्राच्या जिल्हा समन्वयक पदी तालुक्यातील नवेगांव(पा) ग्रामपंचायतचे उपसरपंच तिजेश गौतम यांची निवड करण्यात आली.राज्यातील सरपंचांच्या अधिकराचे संरक्षण करण्याकरिता ही परिषद कार्यरत आहे.निवडीबद्दल नवेगांव ग्रा.पं. सदस्य व गावकार्यांकडून अभिनंदन करण्यात येत आहे. कोरोना पार्श्वभूमिवर ऑनलाइन झालेल्या बैठकीत प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे, उपाध्यक्ष अनिल गीते आदींनी त्यांची निवड केली.

# उपजिल्हा रुग्णालयात कोरोना योद्धांचा सन्मान



तिरोडा: देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टीच्या आघाडीच्या केंद्र सरकारला ३० मे रोजी सात वर्षे पूर्ण होत आहे. यानिमित्त उपजिल्हा रूग्णालय तिरोडा येथे कोरोना वारीयर्सचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देवून आ.विजय रहांगडाले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तिरोडाचे आ.विजय रहांगडाले होते. यावेळी नगराध्यक्ष सोनाली देशपांडे, जि.प.चे माजी उपसभापती मदन पटले, भाजप तालुकाध्यक्ष भाऊराव कठाणे, उपस्थित होते.

कोरोनाची दुसरी लाट परतवून लावण्यासाठी उपजिल्हा रूग्णालयातील कोविड योध्दांनी स्वत:च्या जीवाची पर्वा न करता रूग्णसेवा हिच ई श?वरसेवा हे ब्रिद मनाशी बाळगून प्रयत्नांची पराकाष्ठा केली. परंतु, सेवा करीत असताना आरोग्य विभागातील १४ अधिकारी व कर्मचारी संक्रमित झाले. पण त्यांनी आत्मविश?वास व औषधोपचाराने कोरोनावर मात केली. व परत नव्या जोमाने कामावर परतले. शेवटी सर्वांच्या प्रयत्नाने कोरोनाची लाट ओसरताना दिसत आहे. अशा कोविड काळात सेवा देणा?या योध्दांचा मनोबल उंचावण्याकरीता त्यांचा सत्कार करण्यात आला. ३० मे रोजी केंद्रातील मोदी सरकारला ७ वषार्चा कार्यकाळ पूर्ण केला आहे. यानिमित्ताने त्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आ.रहांगडाले यांच्या हस्ते कमलेश शुक्ला, दिनेश बल्ले, दुर्जन पडोती, लिलाधर कुसराम, मोनिका उके, राहुल बडगे, धनंजय वाडगुरे, शार्लेट भांडारकर, शिप्रा तिराळे, अनमोल लोखंडे, डॉ.विद्या रहांगडाले, डॉ.चंद्रकिशोर पारधी, डॉ.कांचन रहांगडाले, डॉ.हिंमत मेर्शाम यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

# देवरीत अवैध गौणखनिज प्रकरणी ब्याण्णव लाख दंडाची कार्यवाही



देवरी- देवरी तालुक्यात गाजत असलेल्या अवैध गौण खनिज प्रकरणात देवरीचे तहसीलदार विजय बोरुडे यांनी (दि.२६) चार ठिकाणी धाडी टाकून केलेल्या कार्यवाहीत ९२ लाख ५६ हजार ८०० रूपये दंड ठोठावला आहे. परिणामी, देवरी तालुक्यातील गौण खनिज तस्करांचे धाबे चांगलेच दणाणले आहे.

पहिले प्रकरण मौजा नवाटोला भर्रेगाव येथील गोंडवाना वे ब्रीज येथील असून धर्मकाट्यासमोरिल पटांगणावर १० ब्रास बोल्डर विनापरवानगीने साठा करून ठेवल्याचे तालुका प्रशासनाच्या लक्षात आले. या प्रकरणी गैरअर्जदार झामसिंग येरणे रा. देवरी यांचेकडून एकूण १ लाख ५४ हजाराचा दंड ठोठावण्यात आला आहे.

दुसरे प्रकरणी देवरीच्या छत्रपती शाळेच्या मागील पटांगणावरील असून येथे ३० ब्रास रेती साठा करून ठेवल्याचे दिसून आल्याने अनिल झामसिंग येरणे यांचेवर ७ लाख ६२ हजार रुपयाचा दंड ठोठावण्यात आला आहे.

तिसरे प्रकरण बोरगाव बाजार येथील असून राधारमण अग्रवाल रा. डव्वा यांनी ज्ञानेश्वर झाडू ठाकरे यांचे जागेवर ७० टिप्पर( ४२० ब्रास) रेती, ६० ब्रास बोल्डर अवैधरीत्या साठवून ठेवले होते. यामध्ये राधारमण अग्रवाल यांचेवर रेतीसाठी ६१ लाख ४६ हजार ८०० आणि बोल्डरसाठी ९ लाख २४ हजार असा एकूण ७० लाख ७० हजार ८०० रुपये दंड आकारण्यात आला आहे.

चौथे प्रकरण देवरी औद्योगिक वसाहतीमधील असून देवरीचे मनीष अग्रवाल यांनी अवैधरीत्या ५० ब्रास रेतीचा साठा करून ठेवल्याचे चौकशीत आढळून आले. यामध्ये बाजारभाव मूल्याच्या ५ पट असे एकूण १२ लाख ७० हजार रुपयांचे दंड ठोठावण्यात आले आहे.

या चारही प्रकरणात तहसीलदार बोरुडे यांनी धडक कार्यवाही करीत ९२ लाख ५६ हजार ८०० रुपयांचा दंड ठोठावला आहे. तालुका प्रशासनाच्या या कार्यवाही मुळे तालुक्यातील गौण खनिज तस्करांचे चांगलेच धाबे दणाणले आहे.

# कोरोना काळात मालवाहतुकीतून आगाराला वर्षभरात ११.९० लाखाचे उत्पन्न

गोंदिया: कोरोनाच्या संकटाने सर्वच क्षेत्र प्रभावीत झाले आहे. याचा फटका एसटी महामंडळालाही बसला आहे. मागील वर्षीच्या मार्च महिन्यापासून कोरोना संसर्गामुळे एसटीचे उत्पन्न कमालीने घटले आहे. असे असताना या महामारीवर मात करत एसटीने मालवाहतूकीचा आधार घेत थोडे का होईना अर्थार्जन सुरु ठेवली आहे.



वर्षभरात ११.९० लाखाचे उत्पन्न गोंदिया आगाराला झाल्याची माहिती आ-गार सुत्रांनी दिली. "एसटीचा प्रवास सुखाचा प्रवास' हे ब्रीद घेऊन एसटीने आपला प्रवास सुरु केला. तर प्रवाश्यांकडूनही तसा प्रतिसादही एसटी महामंडळाला मिळाला. आजही अनेक प्रवासी एसटी बसच्या प्रव-ासाला पसंती देतात. मात्र, कोरोनाच्या संसर्गामुळे मागील वर्षीपासून एसटीलाही अवकळा येऊ लागली. मागील वर्षी मार्च महिन्यात लावण्यात आलेल्या टाळेबंदीत सर्व सार्वजनिक वाहतुक बंद केली गेली. रेल्वेसे-वेसह एसटीचीही चाके थांबली होती.

परिणामी एसटी महामंडळाला कोट्यवधी रुपयाचे नुकसान सहन करावे लागले होते. त्यात एसटी महामंडळाकडून मालवाहतूकीचा निर्णय घेण्यात आला. अनेक प्रवासी बसेसला मालवाहतूकसाठी तयार करण्यात आल्या. त्यातच मोकळीक प्रक्रीयेदरम्यान, एसटी कात टाकत असल्याचे चित्र असताना यंदा कोरोनाच्या दुसऱ्या लाटेने कहर केला. पुन्हा एसटीची चाके थांबली. शासनाकडून अटी व नियमांतर्गत नागरिकांना प्रव-ासाला मुभा देण्यात आली असली तरी संसर्गाच्या भीतीने प्रवाश्यांनी प्रवास करणे टाळले. परिणामी नाईलनाजाने एसटी बसेसही बंद करण्यात आल्या. आजघडीला गोंदिया आग-ाराचाच विचार करता आगाराकडे ८५ बसेस आहेत. मात्र, प्रवाश्यांविना या बसेस आगारात पडून असल्याचे वास्तव आहे. असे असताना महामंडळाकडून मालवाहतूकीवर भर देत कोरोनावर मात करण्यात येत असल्याचे चित्र आहे. गोंदिया आगारातर्फे वर्षभरात मालवाहतूकीच्या ९० फेऱ्या करण्यात आल्या. त्यापासून ११ लाख ९० हजाराचे उत्पन्न आगाराला प्राप्त झाले. त्यामुळे कोरोनाच्या संकटात एसटीचीही धावपळ सुरू असल्याचे चित्र आहे.

# आदिवासी विद्यार्थी डीबीटी योजना निधीच्या प्रतिक्षेत

## ■ आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांवर अन्याय

## ■ कोरोनाचे ठरले निमित्त

गोंदिया: आदिवासी भागा-तील विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे सुलभ व्हावे व त्याचा विकास साधला जावा, यासाठी शासनातर्फे "डीटीबी' अर्थात थेट लाभ हस्तांतरण योजनेतंर्गत आश्रमशाळेतील प्रती विद्यार्थी रोख रक्कम दरवर्षी त्यांच्या बँक खात्यात जमा केला जातो. मात्र यंदा कोरोनाचे निमित्त समोर करुन अद्यापही शासनाने निधी देण्यात आलेला नाही. त्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये रोष व्यक्त होत आहे.

शासकीय कामकाजात पारदर्शकता यावी, भ्रष्टाचाराला आळा बसावा व शासनाने दिलेला निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा व्हावी, यासाठी थेट लाभ हस्तांतरण योजना राबविली जात आहे. या योजनेतंर्गत आश्रमशाळेत शिकणाऱ्या इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंतच्या प्रत्येक आदिवासी विद्यार्थ्याला ७ हजार ५०० रुपये, इयत्ता सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्याला ८ हजार ५०० रुपये व इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्याला ९ हजार ३०० रुपये देण्यात येतात. हा निधी संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा केला जा-तो. या निधीमधून विद्यार्थ्यांना पुस्तक, वह्या, शालेय गणवेश, क्रीडा गणवेश आदी शैक्षणिक साहित्यासोबतच मंजन, साबन आदी जीवनावश्यक वस्तु खरेदी कराव्या लागतो.

त्यामुळे जिल्ह्यातील आश्रम शाळेत शिकण्याकडे आदिवासी विद्यार्थ्यांचा कल वाढला आहे. जिल्ह्यातील आदिवासी आश्रम शाळेत आजघडीला ३ हजार २७ विद्यार्थी शिक्षण घेत आहे. त्यांना थेट लाभ हस्तांतरण योजनेचा लाभ मिळत आहे. यावर्षी जागतिक महामारी ठरलेल्या कोरोना संकटामुळे फेब्रुवारी महिन्यापर्यंत आदिवासी आश्रमशाळा सुरु होत्या. मात्र, कोरोनाचे निमित्त समोर करुन शासनाच्या थेट लाभ हस्तांतरण योजनेतंर्गत निधी आदिवासी विद्यार्थ्यांना मिळालेला नाही. त्यामुळे आपल्यावर अन्याय होत असल्याची भावना व्यक्त करुन विद्यार्थ्यांमध्ये रोष व्यक्त होत आहे.

**हा तर दुजाभावच!...**

सर्वच शालेय विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासह दर्जेदार सुविधा उपलब्ध करण्यासाठी शासन, प्रशासन प्रयत्नशील राहतो. एकीकडे सर्व शिक्षा अभियानातंर्गत यंदाच्या शैक्षणिक सत्रात जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांसाठी लाखो रुपये शालेय गणवेशासाठी देण्यात आले. मात्र आदिवासी आश्रमशाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना अद्यापही थेट लाभ हस्तांतरण योजनेचा निधी मिळाला नाही. त्यामुळे हा दुजाभाव नव्हे का, असा प्रश्न आदिवासी विद्यार्थ्यांसमोर आहे.

यासंदर्भात देवरी आदिवासी एकात्मिक प्रकल्प कार्यालयाचे प्रकल्प अधिकारी बोकडे यांनी सांगितले, प्रकल्प कार्यालयातंर्गत जिल्ह्यात ११ आदिवासी आश्रम शाळा सुरु असून ३ हजार २७ आदिवसी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यंदा कोरोना संसर्गामुळे फेब्रुवारीपर्यंत शाळा सुरु होत्या. मात्र डीटीबी योजनेतंर्गत निधी उपलब्ध झाला नसल्याने त्याचा लाभ विद्यार्थ्यांना मिळालेला नसल्याचे त्यांनी सांगितले.

# शहीद सैनिक प्रमोद कापगते अनंतात विलीन



सडक अर्जुनी: तालुक्यातील परसोडी येथील नागालँडमधील सीआरपीएफ कॅम्पमध्ये कार्यरत जवान प्रमोद विनायक कापगते (४०) हे २५ मे रोजी सीमवरील चकमकीत शहीद झाले होते. त्यांच्या पार्थिवावर २७ मे रोजी परसोडी येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.जिल्हाधिकाऱ्यांच्या वतीने अर्जुनी मोरगावचे प्रभारी उपविभागीय अधिकारी विनोद मेश्रामङ्ग यांनी पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

यावेळी यावेळी अपर पोलिस अधीक्षक अशोक बनकर, देवरीचे उपविभागीय पोलिस अधिकारी जालंदर नालकुल, अर्जुनी मोरगा-वचे प्रभारी उपविभागीय अधिकारी विनोद मेश्राम, तहसीलदार उषा चौधरी, सीआरपीएफचे नागपूरचे अधिकारी प्रल्हाद सांदेकर, गटविकास अधिकारी एम. एस. खुणे, डुग्गीपारचे पोलिस निरीक्षक सचिन वांगळे, माजी मंत्रीर राजकुमार बडोले, माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाधर परश-ुरामकर व इतर प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. शहीद सैनिक प्रमोद कापगते यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, आई, वडील, एक भाऊ व बराच मोठा आप्तपरिवार आहे.

शहीद प्रमोद कापगते हे केंद्रीय राखीव पोलिस दलात सन २००० मध्ये रुजू झाले. त्यांनी विविध ठिकाणी सेवा दिली होती. सेवा पूर्ण झाल्यानंतर त्यांनी पुन्हा दोन वर्षे सेवा वाढवून घेतली होती. येत्या ऑगस्ट २०२१ ला ते सेवानिवृत्त होणार होते. दरम्यान सीआरपीएफ व पोलिस पथकाने प्रमोद कापगते यांना मानवंदना दिल्यावर त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.